७९८


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा.वा.
दा. क्र. ७९८

# विजयंता भारत.

BVBK-0400798
BVBK-0400798

# १. शत्रूची अभेद्य फळी फोडली!

BVBK-0400798



मेजर सारडा हे नाव प्रसिद्धीला आले. त्यांनी केलेल्या भीम-पराक्रमामुळे. मेजर सारडा म्हणजे मूर्तिमंत पौरुष. मेजर सारडा म्हणजे 'नया चोर'ची जगावेगळी लढाई. याह्यासुराच्या गणगोतांच्या लक्षात राहील अशी. तुंबळ लढाई. ह्या लढाईत मेजर सारडांनी असे अपूर्व विक्रम केले की तो नरपशू शत्रूही कौतुकाने [illegible] लागला असेल.

नया चोर'च्या परिसरात धुमश्चक्री चालू होती. पाकी गनिमांना भारतीय जवान भिडलेले होते. जीवघेणी हातघाई सुरू होती. ह्या भागाने कधी पाहिली नसेल अशी लढाई घडली.

भारतीय जवानांना मुसंडी मारून 'नया चोरचा' पूल ओलांडायचा होता. पण पुलापलीकडे संपूर्ण पाकी बटॅलियन उभी होती. ती प्रचंड फळी ओलांडणे साधे नव्हते. शत्रूने अशी भक्कम रचना केली होती की, भारतीय जवान एक इंचही पुढे जाऊ

शकले नसते. लढाईचे एक उत्कृष्ट तंत्र पाकी सेनानींनी तेथे दाखविले होते.

भारतीय अधिकारीही मेल्या आईचे दूध प्यालेले नव्हते. मेजर सारडांनी ही जबाबदारी जेव्हा स्वीकारली तेव्हाच त्यांनी आव्हान स्वीकारले होते. १९६५ मध्येही त्यांनी लक्षात राहणारी कामगिरी केलेली होती. शत्रूच्या मुलखात ते घुसले असताना एका ठिकाणी त्यांनी तुंबळ लढाई केलेली होती. एका पळपुटचा पाकी अधिकाऱ्याचा पाठलाग करताना त्याचा पाय सुरुंगावर पडला होता. त्या स्फोटात वास्तविक त्यांचा अंत व्हायचा पण केवळ योगायोगाने ते वाचले, फक्त पाय दुखावला. त्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये किती तरी दिवस पडून राहावे लागले होते. त्या पाकी पळपुटचा अधिकाऱ्याने त्यांना बरोवर फसवून सुरुंग पेरलेल्या भागात नेले होते.

शत्रूची संरक्षण फळी त्याच्याच मुलखात होती. तेव्हा त्या पाठीमागे अजून किती रसद आहे हे कळायला काही मार्ग नव्हता. शिवाय शत्रू फार दगाबाज होता. त्यामुळे त्यांची तयारी किती आहे हे कळायला काहीएक मार्ग नव्हता. हा सारा धोका पत्करून हल्ला करणे भाग होते. मेजर सारडा कोणताही धोका पत्करायला तयार नव्हते.

भारतीय जवानांची बटॅलियन शत्रूच्या बटॅलियनसमोर खडी राहिली. अशा परिस्थितीत समोरासमोर हल्ला करणे धोक्याचे होते. शत्रू जर दुर्दैवाने पुढे सरकला तर पाठीमागून रसद मिळण्याची खात्री नसते. हा सारा विचार करूनच मेजर सारडांना पाऊल उचलायचे होते.

रात्रीची वेळ. काळाकुट्ट अंधार पसरला. ढगांमुळे वातावरण पेंगुळले. पारंपरिक पद्धतीने याहयासुराचे शेंदाडशिपाई रात्र झाली

की जरा सुखावले. सुस्तावले. लढाईला तोंड केव्हा पडणार याचा काही नेम नव्हता. धाडस कोण करतो हेच पाहावयाचे होते. याह्यासुराचे गणगोत धुंदीत होते. भारतीय जवान हल्ला करू शकणार नाहीत अशा घमेंडीत ते होते.

पण झाले उलटेच. याह्यासुराचे शेंदाडशिपाई डोळे विस्फारून पाहू लागले. तोबा ऽ तोबा ऽ ! त्यांचा विश्वास बसेना. भारतीय बटॅलियन गनिमावर एकदम तुटून पडली. मेजर सारडांनी आपल्या जवानांसह अशी काही जबरदस्त मुसंडी मारली की काही क्षण गनीम नुसते पाहातच राहिला. खरं आहे. न घडणारी गोष्ट घडली. औरंगजेबाच्या वारसदार सेनेची दाणादाण उडाली. या ऽ अल्ला ! या ऽ अल्ला ! !

जोराची कापाकापी सुरू झाली. भारतीय जवानांनी आमने-सामने जाऊन शत्रूची मुंडकी उडविली. फारा दिवसांची त्यांची इच्छा पूर्ण झाली. शत्रूच्या नरडीचा कधी एकदा घोट घेऊ असे त्यांना झाले होते. शत्रूच्या संरक्षण फळीला त्या दिवशी जबरदस्त दणका बसला.

आता गनिमांचे डोळे उघडले. तो जागा झाला. प्रतिकार करू लागला. पाकी अधिकारी चिडले. त्यांनी सैनिकांना शिव्या घालून पुढे रेटायला प्रारंभ केला. याह्यासुराचे सैनिक चेवले. त्यांनी भारतीय जवानांवर निकराचा हल्ला केला.

"मारो ! पीटो ! तोडो ! " मेजर सारडा सतत जवानांना सूचना देत होते. स्वतः शत्रूवर तुटून पडत होते. ते सगळ्यात पुढे होते. शत्रू बिचकला होता. लंगडणारा मेजर लढताना पाहून त्यांना आश्चर्य वाटत होते. होय. मेजर सारडांच्या मांडीत गोळी शिरली होती. त्यांना मनस्वी वेदना होत होत्या. पण ते सारे दुःख

ते विसरले होते. रणमर्दांना रणांगणाशिवाय दुसरे तिसरे काय सुचणार? दिसणार? आपल्याला गोळी लागली आहे हे ते विसरले होते. रणांगणावर इकडून तिकडे ते असे काही फिरत होते व जवानांना सूचना देत होते की शत्रू नरमला. पळाला.

पण काही वेळच. साप एकदा दुखावला की तो शेवटपर्यंत प्रयत्न करतो चावा घेण्याचा. मेजर सारडांनी पहिली मुसंडी मारून पाकी संरक्षण फळी अक्षरश: खिळखिळी करून टाकली होती. त्यामुळे शत्रूची अखेरची धडपड चालू झाली होती. एका पाठोपाठ हल्ले करण्यास त्यांनी आरंभ केला. भारतीय बटॅलियनला दारूगोळा भरपूर होता. सारी रसद व्यवस्थित होती. त्यामुळे शत्रूचे प्रतिहल्ले तितक्याच वेगाने परतवून लावता येत होते.

एकदा नाही दोनदा नाही शत्रू चक्क सहा वेळा चालून आला. प्रत्येक वेळी दात ओठ खाऊन चेवून येत असे. परंतु झुंझार भारतीय जवानांनी त्यांना दाद दिली नाही. उलट त्यांनाच सळो की पळो करून सोडले. भारतीय जवान मागचा पुढचा कशाचाही विचार करायला तयार नव्हते. त्यांना कशाचेही भान उरले नव्हते. खुद्द मेजर सारडांच्या अंगात रणदेवता संचारली असावी. त्यांनी शत्रूला असे काही तोंड दिले की शत्रू बेजार झाला. शत्रूचे हल्ले थांबले. त्यांचे नुकसान फार झाले. कितीही रसद आली तरी ती टिकत नव्हती.

हीच खरी कसोटीची वेळ होती. शत्रू जेरीला आला होता. वारंवार स्वाऱ्या केल्यामुळे त्यांचे कंबरडे मोडले होते. मेजर सारडांनी ठरविले! एक जबरदस्त दणका द्यायचा. त्यांची मनुष्य हानी फारशी झाली नव्हती. त्यांनी जवानांना भराभर सूचना दिल्या.


पाहता पाहता मेजर सारडा व त्यांचे सारे जवान रणसाहित्यावर तुटून पडले. हा हल्ला अगदी अनपेक्षित असाच होता. जबरदस्त मुसंडी मारली त्यांनी. भारतीय जवानांची धडक पाहून शत्रू पळत सुटला. आता दुसरा इलाज उरलेला नव्हता. भारतीय जवानांनी त्या पळपुट्यांचा पाठलाग करून त्यांना गोळ्यांनी टिपण्यास आरंभ केला. त्यांना पळता भुई थोडी झाली.

राजस्थानच्या अगदी पाकी सीमेवर नया चोर येथे झालेली ही लढाई म्हणजे चालू युद्धातील एक गाजलेली लढाई. ह्या लढाईत जवानांनी मर्दुमकीची परिसीमा करून दाखविली. अभेद्य अशी शत्रूची फळी असताना महान पराक्रमी भारतीय जवानांनी ती फोडून खिळखिळी करून टाकली. मेजर सारडा व त्यांच्या जवानांनी अपूर्व मर्दुमकी गाजविली. केवळ पराक्रमाच्या जोरावर. जिद्दीला पेटल्यामुळे. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' अशी जुनी एक म्हण आहे.

मेजर सारडांनी हेच तत्त्व अवलंबिले. स्वतःच्या मांडीत गोळी घुसली असतानाही विजय मिळेपर्यंत त्यांनी गोळी काढली नाही. हॉस्पिटलमध्ये जाण्यास त्यांना वेळही नव्हता. भारतीय विजयी सेना 'नया चोर' मधून पुढे घुसल्यावर मेजर सारडा हॉस्पिटलमध्ये दाखल झाले.

शत्रूची अभेद्य फळी तोडणारा महान पराक्रमी भारतीय मेजर म्हणून सारडांचे नाव ह्या युद्धात घेतले जाईल.

* * * *




जवान पांडुरंग साळुंखे--! ही गोष्ट आहे तुझ्या असामान्य धैर्याची. तुझ्या भीमपराक्रमाची. तुझ्या जगावेगळ्या बलिदानाची. तसं पाहिलं तर तुझ्या जीवनातील हे पहिलं युद्ध. तू मूळ सांगली जिल्ह्यातील मणेराजुरीचा. महाराष्ट्राचा मावळा. घरची गरिबी. दैन्य पाहवेना. वडील गेलेले. अठरा विश्वे दारिद्र्य संपवायला एकच मार्ग होता. तुला जायचं होतं लष्करांत. पण जाणार कसा? घरी सात माणसं !

कुणाला न सांगता तू बेळगावी भरती झालास. १५ वी मराठा रेजिमेंट तुला सामावू शकली. तिचं नाव तू उजळून टाकणार होतास. ज्या वेळी तू तिच्यात भरती झालास तेव्हा कुणाला कल्पना होती ही !

फारा दिसांचं स्वप्न तुझं पूर्ण झालेलं होतं. तुझा सारा परिसर जवानांचा. घरटी एक तरी लष्करात असायचाच. कुणीतरी सतत

रजेवर आलेलं असायचं. तू त्यांच्या हिरवट पण ऐटबाज पोशाखाकडे पाहात बसायचास, तुला वाटायचं—मिळेल का हा पोशाख मला ? घेतील का मला लष्करात ? येईन का मी असाच सुट्टीवर —खाड खाड बूट वाजवीत—!

आणि तू तसा प्रथमच गेल्या दिवाळीला सुट्टीत घरी आलास– हिरवा पोशाख घालून—बूट वाजवीत खाड् खाड— दिमाखानं सगळीकडे पाहात— तू बारकाईने पाहात होतास— तुझ्यासारखीच इच्छा असणारी पोरं तुझ्याकडं कौतुकानं पाहात होती–! तू हसलास– मनाशी खूप हसलास. काही महिन्यांपूर्वी तूही याच पोरांत जमा होतास– !

पांडुरंगा—! तू आलास दिवाळीला अन् तुझ्या त्या गरिबीच्या झोपडीत विश्वानंद भरला. तुझ्या आईनं– सुंदराबाईनी– मीठमिरच्या ओवाळून टाकल्या तुझ्यावरनं. मुळातच दणकट असलेला तुझा पिंड धष्टपुष्ट झाला होता. मोठा ऐटबाज दिसत होतास तू– चार दिवसांची रजा. तेवढ्या वेळात तू शेतात खपलास– जमिनीतून वर आलेल्या शाळूला मायेनं कुरवाळलंस - हिरवागार पसरलेला तो शाळू हुरड्याला आला तेव्हा तू होतास आघाडीवर– तुझा हात लागलेली ती शाळूची ताटं तुझी वाट पाहात होती–!

पण तू कसा येणार–तुझी १५ वी मराठा रेजिमेंट केव्हाच आघाडीवर येऊन दाखल झाली होती– रात्रंदिवस तू व तुझे साथीदार डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होते– खंदक हेच झालं होतं घर– त्या घरात राहून तुम्ही देशाचं रक्षण करीत होता– हे सारं तुला नवीन होतं– मी म्हणणारी थंडी पडायची– सांगली भागात पडून पडून किती पडणार थंडी–उत्तर भागातली ही थंडी तुला अनोखी वाटायची–त्या तशा थंडीतही सुखदु:खाच्या

चार गोष्टी तुम्ही बोलायचा- रात्र नाही दिवस नाही- थंडी नाही- उन्ह नाही- सारं सारं सहन करून तू नव्या जीवनाला आरंभ करीत होतास- तुझ्या भाग्यानं- तुला लढाईची संधी फार लवकर मिळाली- नवा अनुभव घेण्यास तू उत्सुकला होतास- खरं म्हणजे तू पाहात होतास वाट युद्धाची-!

तुला हवं होतं युद्ध- तुला हवी होती शत्रूची नरडी- तिचा घ्यायचा होता घोट तुला- किती स्वप्नं रचली होतीस तू-लढाई सुरू झाली की तू मागं राहणार नव्हतास- सगळ्यात पुढं जाणार होतास- तुला काही तरी जगावेगळी कामगिरी करून दाखवायची इच्छा होती- तू असा काही पराक्रम करणार होतास की मणेराजुरीलाच काय पण साऱ्या देशाला तुझी कामगिरी कळावी. तू मरणाला भिणार नव्हतास- मृत्यूला घाबरून माघारी नव्हतास फिरणार—तुला विलक्षण चेव आला होता. खंदकात राहण्याचा कंटाळा आला होता. तुझे हात शिवशिवत होते. तुझ्या डोळ्यांसमोर फक्त उभा होता शत्रू- त्यांचे ते सैनिक- त्यांचे रणगाडे! त्या सगळ्यांचा तुला चक्काचूर करायचा होता-- शत्रूच्या गोटात शिरून त्याला 'मऱ्हाठा' दाखवायचा होता- !

आणि झालंही तसंच- तुझी १५ वी मराठा रेजिमेंट शत्रूच्या मुलखात मुसंडी मारीत होती. 'विजयंता' रणगाडे होते आघाडीला- शत्रूच्या उरावर ते रणरणत निघाले होते— शत्रूची माती थरथरू लागली—- तो आवेश- ते रणझुंजार तिला नवे होते— रणगाड्याच्या बरोबरीने तुझ्या रेजिमेंटची एक तुकडी पुढं जात होती- अर्थात तू त्यातच होतास- अगदी आघाडीला— तू ठरविल्याप्रमाणं- पण शत्रूचं 'रॉकेट लॉंचर' एकाएकी चालू झालं- ते अग्निबाण ओकू लागलं- माणसांची काय पण रणगाड्यांचीही

आता धडगत नव्हती– रणगाडे पेटू लागले– जळू लागले– तुटू लागले– आता कसली चढाई— आता कसली मुसंडी ? – सारे जागच्या जागी खिळले– त्या आगीला थांबवणार कोण ? त्या राक्षसाला कोण थंड करणार ? कोण जाणार पुढं ? कुणाचा प्राण आलाय वर ? कोण करणार धाडस ? मरणाला मिठी कोण मारणार ?– दुसरं कोण ? तूच– तू शिवाजीच्या मुलखातला होतास. लेचापेचा नव्हतास– संकटाला घाबरणारा नव्हतास— ती तुझी परंपरा नव्हती– मुंडकं उडविलं गेलं तरी लढणारा मुरार-बाजी देशपांडे तुला माहीत होता– चल पुढं– हो पुढं– मार मुसंडी— अरे पण ही मशीनगन्सची आऽग– त्या आगीची भीती कुणाला ?– तू मृत्युंजय ठरलास– बाकीच्या जवानांनी तुला मागे ओढले तरी तू पुढं धावलास -पुढं निघालास– आता तुझ्या अंगात साक्षात शंकराचा संचार झाला– रणभूमीवर तुझं तांडव चालू झालं— तुझ्यावर गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला– रक्तानं न्हालेला तू पुढंच निघालास– तुला हवं होतं ते रॉकेट लाँचर— शत्रूच्या गनिमानी तुझी वाट अडविली– पण त्यांना तू ढकलून दिलंस– तू धावलास त्या रॉकेट राक्षसावर. हातबॉम्ब्स्‌चा तू असा काही वर्षाव त्यावर केलास की त्याचं कार्य बंद पडलं– शत्रूचे अग्निबाण बंद झाले–!

जवानांनी जयजयकार केला तुझा–रणगाडे रणरणत निघाले– शत्रू पळू लागला– जवान त्यांचा पाठलाग लागले करायला— १५ वी मराठा रेजिमेंट पुढं निघाली— विजयाचा डंका वाजू लागला—

पण तू कुठं होतास–? त्या रॉकेट लाँचरबरोबर तुझीही आहुती पडली– मशीनगन्सच्या गोळ्यांनी तुझ्या देहाची चाळणी झाली–

त्या रॉकेट जवळच तुझा देह विसाव्यासाठी पडला—मणेराजुरीची माती पवित्र झाली– तुला जे वाटत होतं– तसंच घडलं– तुझ्या बलिदानानं युद्धाचं स्वरूप बदललं—१५ वी मराठा रेजिमेंट विजय मिळवून गेली– तुझे बलिदान व्यर्थ झाले नाही– तुझी ती भीम-झेप वाया गेली नाही– तुझा पराक्रम जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत दुमदुमला—!


मणेराजुरीचा पांडुरंग साळुंखे-! तूं मेलेला नाहीस- खरंच आहे– कोण म्हणतो तू मेलास म्हणून– अरे वेड्या ! तू चिरंजीव झालास– काळाच्या इतिहासातून कदाचित तुझे नाव पुसले गेले असेल– पण देशाच्या विजयगाथेत तुझे नाव पहिल्या पानावर चमकले आहे—!

तुला 'महावीर चक्र' मिळाले आहे! '१५ व्या मराठा लाईट इन्फन्ट्रीला' व सांगली जिल्ह्याला हा बहुमान तूच मिळवून दिला आहेस– अगदी पहिल्यांदा– ! सांगली जिल्ह्याच्या कोपऱ्यातील कुठलं तरी चार झोपड्यांचं मणेराजुरी गाव—पण आता ते पवित्र झालं– पावन झालं– उदात्त झालं ! तुझ्या आत्माहुतीनं आज ते नवे तीर्थक्षेत्र बनले आहे ! तुझी भोळीभाबडी दुःखाचे डोंगर प्यालेली आई सुंदराबाई आता वीरमाता झालेली आहे— तुझी चंद्रमौळी झोपडी बलिदानाची हवेली आहे- ! जिथं तू वावरलास— खेळलास– मोठा झालास– ते ते सारे उजळून निघालं आहे !

ही भूमी आहे पराक्रमाची—– पौरुषाची—– तुझ्यासारख्या पांडुरंगाची ! ती तुला विसरणार नाही !

* * * *

# ३. "बाबा! पॅटनचे तुकडे करा"



फाजिल्का आघाडी. मुसंडी मारण्यासाठी जवान तयार आहेत. सीमेच्या पलीकडे पाकी तयारी जोराची आहे. शत्रूने आपल्या 'सुलेमानकी' आघाडीवर भरपूर सेना सुसज्ज ठेवली आहे. सीमेवरील ठाणी अतिशय मजबूत आहेत. त्या भागातून भारतीय हद्दीत आक्रमण करण्याचा शत्रूचा विचार आहे.

मेजर ललितमोहन भाटिया आपले जवान घेऊन वाट पाहात आहेत हुकमाची. त्यांच्या डोक्यावरून पाकी विमाने सुसाट निघाली आहेत. त्यांना दम नाही. थोड्याच वेळात जाहीर झाले की काश्मीर व पंजाबमधील सर्व विमानतळांवर शत्रूने तुफानी गोळामारी केली आहे. आता काही वेळातच तो सीमेवरून हल्ले करणार यात शंका नव्हती.

सीमेवरील भारतीय ठाणीही मजबूत होती. त्या पाठीमागेच मेजर भाटियांचे जवान तय्यार होते. तोफा लावून ठेवलेल्या होत्या.

शत्रूने त्या रात्रीच आक्रमण करण्याचा प्रयत्न करताच सीमा सुरक्षा दलाच्या मदतीला मेजर भाटियांचे जवान धावत गेले. जवानांनी व सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी शत्रूला असा काही जबरदस्त दणका दिला की त्याच्याच हद्दीत लांबपर्यंत पहिल्याच दिवशी त्याला पिटाळून लावण्यांत जवानांना यश मिळाले.

आता सीमेवर मेजर भाटिया व त्यांचे जवान होते. मध्यरात्री त्यांनी शत्रूच्या नजीकच्या ठाण्यावर पुन्हा एकदम आक्रमण केले. इतक्या लवकर पुन्हा भारतीय हल्ला होईल अशी त्यांना कल्पना नव्हती. त्यामुळे त्यांना ठाणे लढविता आले नाही. शत्रू पिसाट पळत सुटला. ठाणे हातात पडले. मेजर भाटियांनी ठाण्याचा बंदोबस्त वाढविला. तिन्ही बाजूंनी मशीनगन्स आग ओकीत ठेवल्या. शत्रू केव्हा येईल याचा नेम नव्हता.

युद्ध वाढले. सगळीकडे घनघोर लढाया चालू झाल्या. याह्याचा-सुराने आपले खरे स्वरूप प्रकट केले. काश्मीर जिंकण्यासाठी त्याने छांब पूंछ भागात जबरदस्त माणूसबळ ओतले. त्यामानाने फाजिल्का भागात त्याचा जोर कमी होता. त्याला तेथे घुसण्यास वावही नव्हता. दोनतीन दिवस मेजर भाटियांनी शत्रूची प्रतीक्षा करण्यात घालविले. तो फिरकत नव्हता.

मेजर भाटियांनी ठाणे अधिक पक्के केले. रात्रंदिवस ते तेथे डोळ्यांत तेल घालून तय्यार होते. एके दिवशी सकाळी त्यांच्या मुलाचे पत्र त्यांना आले. ते वाचून त्यांना तशा परिस्थितीतही हसू फुटले. मुलाने लिहिले होते.

“ बाबाऽ –

तुम्ही आता कोठल्यातरी आघाडीवर असाल. माझे पत्र वाचण्यास तुम्हाला वेळही नसेल. तुम्ही शत्रूवर असा जोराचा हल्ला

करा की शत्रू पळत सुटायला हवा. तुम्ही आमची काळजी अजीबात करू नका. आई व आम्ही सारखे रेडिओ लावून बसत आहोत. तुमचे नाव रेडिओवर येऊ द्या बाबा ! मला वाटतं घरातून पळून यावं ! तुम्हाला शत्रू कापण्यास मदत करावी. माझे हात सळसळत आहेत. कधी एकदा शत्रूच्या नरडीचा घोट घेईन असे मला झाले आहे. आई म्हणते मोठा झालास की जा पप्पांच्या मदतीला. पराक्रम कर. मोठा अधिकारी हो. शत्रूचा नायनाट कर. देश तुझी वाट पाहात आहे. बाबा ! तुम्ही खूप शत्रु-सैनिक सटासटा कापून काढा. त्यांचे रणगाडे तोडा. सुट्टीवर येताना मला खाऊ आणू नका. 'पॅटनचा' चा एक छोटा तुकडा आणा. तुम्ही तोडा पॅटन. मी माझ्या सगळ्या शाळेत तो तुकडा दाखवीन—"

मेजर भाटिया हसत राहिले. पुनः पुनः त्यांना हसू येत होते. त्यांच्या चिरंजिवानी चांगली फर्माईश केली होती. त्याला हवा होता पॅटनचा तुकडा ! खाऊपेक्षाही अधिक मोलाचा. त्यांना त्यावेळी पत्र लिहिण्यास अजीबात वेळ मिळाला नाही. उत्तर लिहायचे राहूनच जात होते. दुसरे तिसरे काहीही सुचत नव्हते, फक्त शत्रू दिसत होता. फसव्या जातीचा, उलटया कवटीचा.

दुसऱ्याच दिवशी शत्रूने तिन्ही बाजूने प्रचंड हल्ला केला. मेजर भाटिया व त्यांचे कडवे जवान तयारच होते. दोन बाजूंनी पॅटन रोरावत येऊ लागले. साऱ्या खंदकामधून जवानांनी असे काही तडाखेबंद हल्ले केले की शत्रूची दाणादाण उडाली. स्वतः मेजर भाटिया पिसाटासारखे धावत होते. एक पॅटन पुढे येताच त्यांनी हातबॉम्बचा असा काही मारा केला की पॅटनने लगेच आचके देऊन प्राण सोडला. त्या पाठोपाठ दोन अजून आले. त्यांचीही तशीच गत मेजर भाटियांनी केली. त्यांच्या जवानांनीही इतर रणगाडे

खलास करून टाकले. शत्रूच्या तोफा बंद पाडल्या. ठाण्याच्या जवळही शत्रू येऊं शकला नाही. नेहमीच्या परंपरेनुसार दारूगोळा व शस्त्रे टाकून शत्रू पळत सुटला. आक्रमण थोपवून धरले गेले.

संध्याकाळीच आकाशवाणीवर बातमी आली.

"फाजिल्का भागात गाजीपूर ठाण्याजवळ शत्रूने जबरदस्त आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. परंतु मेजर भाटिया व त्यांच्या शूर जवानांनी निकराचा सामना करून हल्ला परतवून लावला. मेजर भाटियांनी व त्यांच्या रणमर्द जवानांनी कितीतरी पॅटन नष्ट केले. लढाईचा तपशील अजून हाती यावयाचा आहे–"

मेजर भाटियांची मुले रेडिओ ऐकीत होती. त्यांनी घर डोक्यावर घेतले. पत्र लिहिणारा त्यांचा मुलगा तर साऱ्या बंगल्याभोवती गर्जत ओरडू लागला. "पप्पांनी पॅटन खलास केले! पप्पांनी पॅटन तोडले– फोडले"

मेजर भाटिया व त्यांच्या जवानांनी खरोखरच भीमपराक्रम केला होता. शत्रूचा कुटिल हेतू पूर्ण होऊ दिला नाही.

गाजीपूर ठाणे तेथून जवळच होते. तेथे त्याची जबरदस्त तयारी होती. त्या ठाण्यावरूनच त्याने अति प्रचंड आक्रमण केले होते. तेथे त्याची भरपूर रसद होती. तो तेथून पुन्हाही येण्याची शक्यता होती. मग ते ठाणेच का आपण घेऊ नये? मेजर भाटियांनी वरिष्ठांना योजना सांगितली. त्यांनी मंजुरी दिली.

आता मेजर भाटियांना गाजीपूर ठाणे हस्तगत करावयाचे होते. त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना व जवानांना सर्व योजना समजून दिली. त्या दिवशी रात्री अचानक हल्ला करावयाचा होता. शत्रूच्या तयारीचा सारा अंदाज घेतलेला होता. धडक फार मोठी

होती. त्यात धोकाही होता. कारण शत्रूला वाटेल तेवढी रसद मिळण्याची शक्यता होती. ती काही तोडता येत नव्हती.

मध्यरात्रीच्या अंधारात गाजीपूरच्या ठाण्याच्या परिसरात मेजर भाटियांचे जवान सरकू लागले. शत्रूला कळले नाही. एकदम हल्ला केला पण ठाणे मजबूत होते. शत्रूने अशी काही जबरदस्त सरबत्ती चालू केली की मेजर भाटियांचे आघाडीचे पंचवीस जवान एकदम कामी आले. पण त्यामुळे खचून न जाता बाकीचे जवान पुढे जाऊ लागले. बऱ्याच खंदकामधून मारा चालू होता. एकेका खंदकाकडे जवान हळूहळू पुढे सरकत होते. जवानांनी केलेल्या खंदकावरील हल्ल्यामुळे कितीतरी सैतान मरणाच्या खाईत लोटले गेले होते. मेजर भाटिया दोन पॅटनचा समाचार घेत होते. एक त्यांनी पाहता पाहता खलास केला. दुसरा दणदणत पुढे येताच त्याचाही निकाल लावून टाकला. त्यांच्या जवानांनीही चार पॅटन खलास केले होते. तीन पॅटन पलीकडे तसेच उभे होते. त्यात बहुतेक गनर्स नसावेत. ते नष्ट न करता तसेच जिवंत पकडण्याचा मेजरांचा इरादा होता. त्याच्यावर देखरेख करण्यास दोन जवानांना त्यांनी सूचना दिल्या. त्यात कोणी गनर्स नाहीत याची खात्री करण्यासाठी. पण ते हलले नाहीत.

मेजर भाटियांच्या एका बाजूच्या तुकडीने सरबत्तीची अशी काही बहार केली की शत्रूची हिंमत सुटू लागली. त्याच्या सैनिकांचे मनोधैर्य खचले. पळापळी चालू झाली. शत्रू खरोखरच पळत सुटला. जवानांनी पाठलाग केला. बऱ्याच जणांना भारतीय हिसका दाखविला. शत्रू पार पळाला.

मेजर भाटियांचे जवान शत्रूचा दारूगोळा व्यवस्थित लावू लागले. तीन जिवंत पॅटन ठाण्याजवळ आणून ठेवले. ती मोठी

शिकार साधली होती. त्या पॅटन्सच्या तोफा शत्रूच्या मुलखात लावून ठेवल्या-- मशीनगन्स चालूच होत्या. तिन्ही बाजूला.

मेजर भाटिया रणांगणावर भटकत होते. त्यांचे बरेच जवान कामी आले होते. त्याबद्दल त्यांना जरा वाईट वाटत होते. इतक्या प्राणांचे मोल देऊन त्यांना विजयश्री प्राप्त झाली होती. त्या जवानांनी देशाच्या उद्याच्या भवितव्यासाठी बलिदान केले होते.

दुरून रणगाड्यांचे आवाज ऐकू येऊ लागले. मेजर भाटियांनी चाहूल घेतली. काही रणगाडे येत होते. शत्रू लगेच पुन्हा येण्याची चिन्हे दिसत होती. त्यांनी जवानांना सावध केले. एक रणगाडा पुढे येत होता. त्या दिशेने मेजर पळत सुटले, तोच त्या बाजूच्या एका खंदकात काहीतरी हलले. मेजरनी काहीएक विचार न करता चार पाच हातबॉम्ब फेकले. दणादण स्फोट झाले. पंचवीस तीस गनीम त्यात लपून राहिले होते ! कुणाचेही लक्ष गेले नव्हते. त्यांनी अजून काहीं हातबॉम्ब टाकले. तोवर काही जवान धावत आले. चार पाचजणांनी पळण्याचा प्रयत्न केला. पण जवानांनी त्यांना गोळ्या घातल्या ! हे हरामखोर जर मेजर भाटियांच्या लक्षात आले नसते तर त्यांनी आपल्या किती तरी जवानांचा निकाल लावला असता ! वेळ चांगली म्हणायची.

तो रणगाडा रोरावत पुढे येताच त्याचा मेजर भाटियांनी बळी घेतला. कुठला तरी चुकार रणगाडा होता तो. त्या पाठोपाठ अजून काही येतील असे वाटले. पण आले नाहीत. त्यांचे जवान सामना करण्यास तयार होते.

ह्या चढाईत फायदा फार झाला. भरपूर युद्धसामग्री हाती आली. अठरा सैतान शरण आले. शिवाय ते तीन पॅटन.

मेजर ललितमोहन भाटिया-! तुम्ही पराक्रमाची शर्थ केलीत.

फाजिल्का भागातून शत्रूला आक्रमण तर करू दिलेच नाही, पण त्याच्या हद्दीतच त्याला आत रेटले तुम्ही. तुमच्या कामगिरीला तोड नाही.


शिवाय तुमच्या मुलाचीही इच्छा पूर्ण केलीत. किती पॅटन्सचा खिमा केलात तुम्ही. द्या आता त्यांचे तुकडे खेळायला त्या भावी जवानाला ! गोट्या खेळण्यापेक्षा त्याला त्या पॅटनच्या तुकड्यांशी खेळू द्या.

उद्याचे पॅटन तोच फोडणार आहे !

* * * *

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ...७९८... दिनांक .......
विषय किशोर क्र. . २९५.

# ४.  गनिमांना पाणी पाजले!



सारी पश्चिमा पेटून निघाली. पश्चिम सीमेवरून सगळीकडे भारतीय जवान घुसू लागले. एका रात्रीत कितीतरी मैल आत जवान घुसले. बऱ्याच ठिकाणी जबरदस्त प्रतिकार होत होता. काही ठिकाणी एखादी चौकी किंवा ठाणे घेतले की काम व्हायचे. पुढच्या साऱ्या वाटा मोकळ्या. पिलबॉक्सेसचा अडथळा १९६५ मध्ये अगदी सुरुवातीला आला. त्या उद्‌ध्वस्त करण्याचे तंत्र एकदा जवानांनी हुडकून काढायचा अवकाश. सगळीकडच्या पिलबॉक्सेस धडाधड कोसळल्या. यावेळी ह्या पिलबॉक्सेस ठिकठिकाणी खंदकांच्या जोडीने होत्या. पण जवानांनी त्यावर ताण केली.

'बसंतार' नदीच्या तीरावर तुंबळ लढाई चालू होती. ३ ग्रेनेडिअर्सचे मेजर होशियारसिंह त्यांच्या बहाद्दूर जवानांसह पाकी हल्ल्याला तोंड देत होते. पाकी सैतानांनी विलक्षण आग ओकायला आरंभ केला होता. गोळ्यांची बरसात चालू होती. पण

जवान त्याची पर्वा करीत नव्हते. मेजर होशियारसिंहांच्या रणमर्द जवानांनी पाकड्यांना असा काही हात दाखविला की त्यांचा तोफखाना बंद पडला. आग ओकणाऱ्या मशीनगन्सवर जवानांनी अचूक हातबॉम्ब टाकले. प्राणाची पर्वा न करता जवान पुढे घुसत होते. त्यामुळे भयभीत झालेले पाकी पळत सुटले होते. दारूगोळा, शस्त्रे सारे तिथेच पडले. त्यांची काळजी घ्यायचे त्यांना कारण नव्हते. अमेरिकेची व चीनची फुकटम्फाकट मिळालेली चैन होती.

त्यावेळी पाकडे पळाले खरे. पण ते पुन्हा दुप्पट तयारीनिशी येण्याची भीती होती. त्यांच्याजवळ शस्त्रांना तोटा अजीबात नव्हता. माणसे कितीही मेली तरी हरकत नव्हती. याह्यासुराने आपल्या सर्व अधिकाऱ्यांना तशा सूचना दिल्या होत्या. प्रश्न पाकड्यांचा नव्हता. समस्या वेगळीच होती. ' बसंतार ' नदीवर इंजिनियरिंग कोअरला तात्पुरता पूल बांधायचा होता. त्यावरून जवानांना पुढे मुसंडी मारायची होती. पूल बांधताना सैतान त्राही भगवान करून सोडण्याची शक्यता होती. पूल बांधताना त्यांचे अडथळे नको होते. जवान त्याला भीत होते असा त्याचा अर्थ नाही. गोळ्यांच्या वर्षावातही आपल्या नेकजात जवानांनी कितीतरी वेळा पूल बांधले आहेत.

गनिमाचे लक्ष तात्पुरते का होईना अन्यत्र लावणे आवश्यकच होते. मेजर होशियारसिंहांना ' बसंतार ' नदीजवळील त्या भागातील शेजारचे ठाणे घेण्याचा हुकूम मिळाला. ते ठाणे पक्क्या बंदोबस्तात होते. गनीमही मोठ्या प्रमाणात होते. मेजर होशियारसिंहांनी त्या रात्री वेषांतर करून ठाण्याचा परिसर पाहिला. अतिशय सावधतेने ते गेले होते. कोठून हल्ला करणे सोयीचे आहे हे त्यांनी स्वतः पाहिले. खंदक व पिलबॉक्सेसचा अंदाज घेतला. ते तातडीने परतले.

थोड्याच वेळात ते हल्ला करण्यास निघणार होते. 'ग्रेनेडिथर्स–३' च्या आपल्या कडव्या जवानांना त्यांनी साऱ्या सूचना दिल्या. एकदम समोरून हल्ला न करता दोन्ही बाजूंनी हल्ला करण्याचे त्यांनी ठरविले. काही निवडक जवान त्यांनी बाजूला ठेवले. शत्रूची पीछेहाट सुरू झाली की त्यांनी एकदम पुढे यावयाचे होते. शत्रूवर पिसाटासारखे तुटून पडायचे होते.

मेजर होशियारसिंह व त्यांचे जवान दबकत दबकत निघाले. ठाण्याच्या परिसरात येताच शत्रूने त्यांना हेरले. एकदम जोराचा हल्ला केला. आगीपाठोपाठ आग येऊ लागली. अंधाराच्या पार्श्वभूमीवर आगीचा चकचकाट वाढू लागला. उठून दिसू लागला. ग्रेनेडियर्स–३ मधील एकही जवान विचलित झाला नाही. खंदकांच्या आधारे शत्रूचा जोर वाढत होता. खंदकांपर्यंत जाणे आवश्यक होते. मेजर होशियारसिंह सर्वांत पुढे होते. एका खंदकापर्यंत तेच अगोदर पोहोचले. त्यांनी हातबॉम्बचा मारा सुरू करताच आग ओकणारी मशीनगन बंद पडली. ती चालविणारे दोन सैतानही किंचाळ्या मारून अल्लाऽ अल्लाऽ करीत खलास झाले. मेजरांच्या पायात एक गोळी घुसली होती. ती काढून टाकण्याचा त्यांनी क्षणभर प्रयत्न केला पण निघाली नाही. शिवाय दुसऱ्या खंदकातून मारा सुरू झाला होता. तो थांबवायला हवा होता. बाकीच्या जवानांनीही आगेकूच चालू केली होती. दोन्हीकडून एकदम हल्ला झाल्यामुळे सैतान घाबरून गेले होते. काही सुचेना त्यांना.

अखेर नेहमीचा मार्ग त्यांनी स्वीकारला. अंगातील शक्ती एकवटून ते पळत सुटले. तोच मेजरनी ठेवलेले ताज्या दमाचे जवान एकदम पुढे घुसले व त्यांनी त्यांचा पाठलाग करून एके-

काला टिपायला आरंभ केला. आपल्या जवानांच्या चौपट अधिक असलेले गनीम पळत सुटले होते. ठाणे मोकळे झाले. प्रचंड दारूगोळ्यासह ठाणे हाती आले. लांबपर्यंत शत्रूचा पाठलाग करून त्याला हाकलून लावले. त्याच्याच ठाण्यावरील मशीनगन्स घेऊन तिन्ही बाजूला जवानांनी चालू ठेवल्या.

शत्रू ठेचला गेला होता. पुरता निःपात त्याचा झाला नव्हता. त्याच्या नेहमीच्या खोडीप्रमाणे तो पुन्हा तयारीने येण्याची शक्यता होती. मेजर होशियारसिंहांनी तशी तयारी ठेवली होती. अजून जादा रसद आणली होती. दारूगोळा भरपूर तयार ठेवला. तिन्ही बाजूंनी मशीनगन्स सतत आग ओकीत होत्या. शत्रूच्या तयार खंदकांचा आपल्या जवानांना चांगलाच फायदा मिळणार होता. त्यात त्यांनी पक्के मोर्चे लावले. रात्रभर सारेजण डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होते. गस्त घालीत होते. मेजर होशियारसिंह स्वतः सतत सगळीकडे फिरत होते. जरा कुठे काही आवाज जरी आला तरी त्या दिशेला प्रचंड आग ओकीत होते. रात्रभर कोणी फिरकले नाही. शत्रूने चाहूल घेतली असावी. पण पक्का बंदोबस्त पाहून कदाचित तो परतला असावा.

दुसरे दिवशी मात्र खरोखरच प्रचंड तयारीने शत्रू आला. तिन्ही बाजूने त्याने चढाई करण्याचा प्रयत्न केला. दोन बाजूने तर त्याने रणगाडे आणले !

मेजर होशियारसिंहांनी अशा हल्ल्याचीच अपेक्षा केली होती. त्याची सारी व्यवस्था त्यांनी तयार ठेवली होती. खंदकात बसून साऱ्या जवानांनी प्रतिकार चालू ठेवला. ह्या खंदकातून त्या खंदकात मेजर होशियारसिंह सारखे फिरत होते व जवानांना सूचना देत होते. जवानांनी असे काही बहारीचे हल्ले केले की शत्रूची

धाबरगुंडी उडाली. जवानांनी अशा काही विलक्षण तऱ्हेने तोफा डागल्या की रणगाडे पुढे येऊ शकले नाहीत. ते फुटू लागले. तुटू लागले. एखादा पुढे येऊ लागलाच तर हातबॉम्बचा अचूक मारा जवान करू लागले. मशीनगन्स व उखळी तोफांच्या माऱ्याने एकही गनीम पुढे येऊ शकला नाही. रणगाड्यांची वाताहात होताच गनीम पळून गेला ! पळत सुटला, खंदका खंदकांत लपलेले मेजर होशियारसिंहांचे जवान पुन्हा सैतानांच्यावर तुटून पडले. त्यांना पळता भुई थोडी झाली. रणगाड्यांचे मुडदे व गनिमांच्या प्रेतांचा सगळीकडे खच पडला. ठाण्याच्या हद्दीत देखील गनीम येऊ शकले नाहीत. इतका मोठा डाव रचला होता पण गनीम भुईसपाट झाला. त्याचा डाव त्याच्याच अंगलट आला. रणगाड्यांच्या जोरावर ठाणे चिरडण्याचा त्याचा हेतू होता; पण मेजर होशियारसिंहांच्या ग्रेनेडियर्स–३ ने पौरुषाचा विलक्षण चमत्कार करून याह्यासुराचे असुर पळवून लावले.

आता तर त्यांच्या शेपटीवर पाय ठेवला गेला होता. त्याच्याच भूमीत त्याचा अपमान झाला. खाली माना घालून त्याला परतावे लागले. पाकी सेनानी चिडले. त्यांनी त्या अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. त्यांना तेथून काढून घेतले. नव्या दमाचे अधिकारी नेमून पुन्हा नवी चाल करण्याचे मनसुबे पाकी सेनानी करू लागले.

मेजर होशियारसिंहांना तिसरा हल्ला अपेक्षित होताच. त्यांनी ठाणे अजून बळकट केले. नवी कुमक मागवून घेतली. शस्त्रास्त्रे वाढविली. ठाण्याचा पक्का बंदोबस्त केला. शत्रूने कितीही प्रचंड आक्रमण केले तरी ते परतवून लावण्याचा निश्चय केला. त्यांचा एक पाय दुखावलेला होता. पण त्याच्याकडे पाहायला त्यांना वेळ

नव्हता. सैतानांच्या स्वागताची तयारी करीत होते आता ते. त्याला असा हिसका दाखविणार होते की त्याने पुन्हा इकडे फिरकता कामा नये. इंजिनियर्सनी पूल बांधलेला होता. त्यामुळे आता वाटेल तेवढी मदत ऐनवेळी येऊ शकत होती. शत्रूचे तीन तेरा करण्यास वेळ लागणार नव्हता. त्याही रात्री त्यांनी शत्रूची वाट पाहिली. पण तो आला नाही. त्याची तयारी झाली नसावी.

दुसऱ्या दिवशी त्याला गप्प राहवले नाही. प्रचंड मनुष्यबळ त्याने तेथे ओतले. आग पाखडीत तो रणभूमीत उतरला. संपूर्ण एक ब्रिगेड व रणगाड्यासह त्याने आक्रमक पवित्रा घेतला. मेजर होशियारसिंह जबरदस्त तयारीने आखाड्यात उतरले. शत्रूच्या आगीला न भिता ते रणभूमीवर मुक्त संचार करू लागले. किती तरी गोळ्या त्यांच्या हातापायांत घुसल्या. ते रक्तबंबाळ झाले. पण त्यांना त्याचे काहीच वाटेना. साक्षात रणचंडी त्यांच्या अंगात संचारली.

लाईट मशीनगनच्या साह्याने ते शत्रूवर तुटून पडत होते. जवानांना उत्तेजन देत होत. रक्तबंबाळ मेजर लढत आहे हे पाहून जवानांना विलक्षण जोम प्राप्त झाला. भारतमातेचा जयजयकार करीत त्यांनी शत्रूचे रणगाडे व तोफा टिपायला प्रारंभ केला. तुंबळ सामना कितीतरी वेळ चालू राहिला.

शत्रू मागे हटू लागला. चिनी व अमेरिकन बनावटीच्या रणगाड्यांनी आजही पुन्हा धोका दिला. त्यांची जळकी धुडे सर्वत्र आ वासून वेडीवाकडी होऊन पडली होती. आता गनीम उघडे पडले. रणगाडे व तोफांचे संरक्षण संपले.

मेजर होशियारसिंह व त्यांच्या रणनवऱ्या जवानांनी पराक्रमाचा हिमालय उभा केला. एक नाही, दोन नाही, तीन दिवस

सतत सैतानांशी जबरदस्त धडक चालू होती. प्रत्येकवेळी सैतान ‘ भागो ऽ भाऽगो ऽ ’ करीत होता. ही किमया होती भारतीय जवानांची. त्यांच्या अद्‌भुत सामर्थ्याची. जगावेगळ्या पौरुषाची. रसरसलेल्या ध्येयवादाची. देशनिष्ठेची.

मेजर होशियारसिंहांच्या मशीनगनला गनिमाचा कंपनी कमांडर बळी पडताच, गनीम पळू लागले. पाहता पाहता अजून तीन चार अधिकारी बळी पडले. आता मात्र सेनेला दम धरवेना. याहृया-सुराचे शेंदाड शिपाई शस्त्रे टाकून पळत सुटले ! पळाले. लांब पळाले ! ! पळता पळता किती तरी जवानांनी टिपले.

शत्रूच्या मुड्यांचे ढीगच्या ढीग पडले होते सर्वत्र. त्याची दाणादाण उडालेली दिसत होती. आज तिसऱ्यांदा पराभूत होऊन तो पळाला होता. ठाण्यावरचा तिरंगा झेंडा आजही मानाने फड-फडत होता.

भयंकर जखमी झालेल्या मेजर होशियारसिंहांना नाइलाजाने हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागले.


त्यांच्या पराक्रमाला त्या लढाईत तोड नव्हती. एका पाठोपाठ हट्टाने पेटून शत्रून केलेले तिन्ही हल्ले त्यांनी परतवून लावले होते. तिरंग्या झेंड्याची शान राखली होती. भारताची पौरुषाची परंपरा सांभाळली होती.

त्यांना ‘ महावीर चक्र ’ मिळाले. हा त्यांच्या रणझुंजार रण-नीतीचा गौरव होता. त्यांच्या कुशल रणनेतृत्वाचा होता. तीन दिवस शत्रूने प्रचंड आक्रमण केले तरी त्यांनी गनिमांना पिटाळून लावले.

ही जिद्द होती असामान्य. त्या महापराक्रमाला तोड नव्हती. मेजर होशियारसिंहांनी शत्रूला अक्षरशः पाणी पाजले. ‘शक्करगड’-च्या परिसरातील ही एक गाजलेली लढाई.

* * * *

# ५. नवा क्षात्र धर्म!



१९६५ च्या युद्धात 'खेमकरण' गाजले पॅटनची दफनभूमी म्हणून. अमेरिकेच्या ह्या तथाकथित प्रचंड व जगप्रसिद्ध रण-गाड्यांच्या चिंध्या केल्या भारतीय जवानांनी. न तुटणारे, न फुटणारे न जळणारे व अजिंक्य असे पॅटन तुटले, फुटले व जळले! अजिंक्य भारतपुत्रांनी त्यांचा 'खेमकरणी खिमा 'करून टाकला.'

इतिहास पुनः पुन्हा घडतो असे म्हणतात. खरं आहे. १९६५ चा इतिहास १९७१ मध्ये पुन्हा घडला. पाकी रणगाडे व भारतीय जवान यांची गांठ पडली खेमकरण ऐवजी शक्करगडला! पाकी रणगाड्यांची ती दफनभूमी ठरली. शक्करगडच्या नावाने आज-पर्यंत पाकी जनतेच्या तोंडाला जर पाणी सुटले असेल तर ह्याच नावामुळे. पाकी सेनानींची तोंडे कोयनेलची कडू जहर गोळी घेतल्यासारखी झाली. त्यांना तो भाग 'कोयनेलगड' वाटला! शक्कर खाल्ली भारतपुत्रांनी!

इथे घडला नवा इतिहास. पाकी भूगोल बदलून टाकणाऱ्या ह्या लढाईचा इतिहास मात्र चिरंजीव राहणार आहे. 'शक्करगड' च्या परिसरात लढला एक वीस वर्षांचा भारतपुत्र. 'कालचा पोर. आज लढला. त्याचे तेज असे काही चमकले की पाकी सेनानी आपली काळी तोंडे घेऊन पळत सुटले. त्यांना पळता भुई थोडी झाली. वीस वर्षांचा भारताचा एक सुपुत्र काय करू शकतो हे त्यांनी पाहिले. त्यांच्या त्या रणभूमीने पाहिले. रात्रीची वेळ. शक्करगडचा परिसर. बसंतार नदी शांतपणे वहात आहे. आपल्या तीरावर काही चिरंजीव घटना घडणार आहेत याची तिलाही कल्पना नव्हती. भारतीय जवान शक्करगडच्या रोखाने पुढे चालले आहेत. शक्करगडच्या विविध दिशांनी भारतीय जवानांच्या तुकड्या एकत्र येत आहेत. बसंतार नदीच्या काठाकाठाने मेजर बहल व त्यांचे शूर जवान पुढे सरकत आहेत. पाकी सैतानांनी पेरलेले सुरुंग हुडकून काढून, त्यांना डावलून जवानांची चढाई चालू आहे, छांब व पूंछ भागांत पाकी सेनानींनी केलेल्या प्रचंड आक्रमणाला शह देण्यासाठी भारतीय रणतज्ज्ञांनी ही मोहीम आखलेली आहे. सियालकोट भागांत तिन्ही बाजूंनी भारतीय जवान घुसत आहेत. सांबा भागातून मेजर बहल व त्यांचे रणमर्द जवान घुसत आहेत. बसंतार नदीजवळ त्यांना प्रचंड अडथळा आलेला आहे. नदीकाठावरील 'सराजचक' खेडे हाच पाकी मोर्चा बनलेला आहे. सारे गाव झालेले आहे मोकळे. त्या मोकळ्या गावातील घराघरांतून पाकी सैनिकांनी मोर्चे उभारले. गावाभोवती उंचच्या उंच असणारे सरकंड गवत. त्या गवतात पाकी रणगाडे लपलेले आहेत. साऱ्या गावाभोवती सुरुंग पेरलेले आहेत, माणसांसाठी व रणगाड्यांसाठी. मेजर बहलना याची कल्पना आलेली आहे.

आता लढाई खेळायची तर रणगाडे हवेत हे त्यांना कळून चुकले. शत्रूजवळ उदंड रणागाडे होते. त्यांनी प्रचंड आक्रमण करून जवानांची आगेकूच थांबवली असती. शत्रूने प्रचंड गोळा-मारी चालू केली. पिसाट गोळीबार चालू आहे. शत्रूला चाहूल लागली आहे. विचार करण्यास अवधी नाही.

मेजर बहलनी, जवळच्या रणगाडा दलाशी संपर्क साधला. 'पूना हॉर्स' पथक जवळच होते. १९६५ च्या लढाईत ह्याच 'पूना हॉर्स' ने 'फिलोराच्या' रणभूमीवर पाकी रणगाड्यांना गडबडा लोळविले होते. 'पूना हॉर्सच्या' लेफ्ट. कर्नल तारापोरनी त्यावेळी पटापट पॅटन तोडले होते. ह्या 'पूना हॉर्स' रणगाडा पथकाची पाकी सेनानींनी विलक्षण धास्ती घेतलेली होती. मेजर बहल यांचा संदेश येताच 'पूना हॉर्स' च्या प्रमुखानी 'निघालो' म्हणून संदेश दिला.

आता मेजर बहलनी आपला तोफखाना चालू केला आहे. भारतीय तोफांचे प्रचंड गोळे सराजचकमधील घराघरांवर कोसळत आहेत. त्या घरांच्या आडोशाला सुखाने बसलेल्या पाकी सैनिकांचे धाबे दणाणले आहे. सुरुंगामुळे भारतीय जवानांना गावाजवळ देखील येता येणार नाही अशा थाटात व भरवशावर ते निवांत होते. पण प्रत्यक्षात वेगळेच घडले. पाकिस्तानच्या ८ व्या ब्रिगेडला माती चारण्यासाठी मेजर ब्रहल तयार झाले.

सरकंड गवतात लपून राहिलेले चिनी बनावटीचे रणगाडे हळूहळू बाहेर सरकू लागले आहेत. मेजर बहल पुन्हा एकदा रणगाड्यांच्या प्रमुखांशी बोलत आहेत. रणगाडादल निघाले आहे. 'पूना हॉर्स' निघाले आहेत. मेजर बहल व त्यांच्या जवानांनी सारे सराजचक भाजून पोळून काढले आहे. शत्रूच्या खंदका-

खंदकावर आता जवान तुटून पडत आहेत. अंगावर गोळ्या तर घेत आहेतच पण गोळेही अंगाअंगावर फुटत आहेत. आघाडीच्या जवानांची आहुती पडू लागली आहे. डोळ्यांत प्राण उभे राहिले आहेत मेजरांच्या. ते विलक्षण कासावीस झाले आहेत. रात्रीच्या त्या काळ्यांशार अंधारातही त्यांच्या चेहऱ्यावरची चिंता स्पष्ट दिसत आहे. त्यांच्या जवानांच्या प्राणाची त्यांना काळजी वाटत आहे. रणगाडे येण्यापूर्वीचा शत्रूचा कावा त्यांना समजला आहे. आघाडीचे जवान त्याला खलास करायचे आहेत. म्हणजे मग त्याला पुढे घुसून मागील जवानांची कत्तल करायची आहे. शत्रूचा हा डाव मेजर बहलना हाणून पाडायचा आहे.

रणगाडे निघाल्याची बातमी जवानांना समजली. त्यांना जोर चढला. जिवाची बाजी लावून ते लढू लागले. काय वाटेल ते झाले तरी मागे हटायचे नाही हा आहे त्यांचा निर्धार. मेजर बहल देत आहेत त्यांना साथ. पुढं येऊ पाहणारे रणगाडे फोडत आहेत. गवतातून रणगाडा पुढं यायचा अवकाश की अंधारात लपलेले भारतीय कर्दनकाळ जवान त्यावर तुटून पडत. हात-बॉम्बची बरसात होई. रणगाड्यांची प्रेते पडू लागली. भारतीय रणगाडे येण्यापूर्वीच रणमर्द जवानांनी चिनी बनावटीचे रणगाडे फोडून टाकण्यास आरंभ केला आहे.

अंधाराशी टक्कर देत ‘ पूना हॉर्सच्या ’ चार कंपन्या निघाल्या आहेत. रणधुमाळीच्या दिशेने त्या येत आहेत. आघाडीच्या तुकडीचे प्रमुख आहेत कॅप्टन मलहोत्रा. त्यांनी संपर्क साधला आहे. मेजर बहल त्यांना मार्गदर्शन करीत आहेत. त्यांनी एक ‘ मार्गदर्शक ’ गोळी हवेत उडविली आहे. तिच्या प्रकाशाच्या रोखाने कॅप्टन मलहोत्रा निघाले. त्यांच्या पाठोपाठ आहे वीस वर्षांचा कोवळा सेकंड लेफ्टनंट अरुण क्षेत्रपाल.

रणगाडें पुढे येताच त्यांच्या आसऱ्याला जवान निघाले. आता घनघोर लढाई होणार. रणगाड्यांना भिडणार रणगाडे. शत्रूची उडणार दाणादाण, पूना हॉर्सचा हिसका आहे आता कळणार.

दाट काळोख पसरला आहे. भारतीय रणगाड्यांनी शत्रू टिपायला आरंभ केला आहे. जवान तुटून पडले आहेत, खंदक नि खंदक शोधून ते कापाकापी करीत आहेत. आगीच्या वर्षावाला न जुमानता. शत्रू खवळला. भारतीय रणगाडे ऐनवेळी येऊन असा घात करतील असे गनिमाला वाटले नव्हते. रणगाडे येण्यापूर्वी त्याने जवानांना पिटाळून लावण्याचा प्रयत्न केला. पण त्याला जमले नाही. उलट घडले. त्यालाच मागे फिरावे लागले. गावा-भोवतालची त्याची पहिली साखळी तुटली. सगळीकडून माघार घ्यावी लागली. जवान पुढे घुसू लागले. बेफाम कत्तल सुरू झाली आहे. मेजर बहलना विलक्षण जोर चढला आहे. ते पुढेच घुसत आहेत. त्यांनी मदतीला अजून जवान बोलावले. शेजारच्या भागातून ते तातडीने आले. आल्या आल्या ते शत्रूला भिडले. कापाकापी वाढली. रक्ताचा सडा पडला.

शत्रू बिचकला. त्याचे रणगाडे किती खलास झाले याला हिशोब नव्हता. त्याने अजून रणगाडे मागितले. ते रणरणत निघाले. भरभक्कम असलेले ठाणे पडण्याचा प्रसंग येऊ घातला.

पहाट होताच सारी परिस्थिती लक्षात आली. शत्रूचं प्रचंड नुकसान झाले आहे. ठिकठिकाणी शत्रूची प्रेते पडली आहेत. रणगाडे जळत आहेत. शत्रू मागे हटला आहे. पण त्याने अजून रणगाडा कुमक मागविली आहे. एकेक रणगाडा पुढं सरकत आहे. शत्रूने काहीतरी व्यूह रचला आहे.

कॅप्टन मलहोत्रा व सेकंड लेफ्ट. अरुण क्षेत्रपालांच्या ते लक्षात

आले आहे. त्यांनीही आपली व्यूहरचना बदलली आहे. आता सूर्याला साक्षी ठेवून शत्रूला भिडायचे आहे. सराजचक घ्यायचे आहे.

शत्रू सरसावला. अंधाराचा फायदा घेऊन त्याने रणगाडे विखरून ठेवले आहेत. त्यांना गणती नाही. सेकंड लेफ्ट. अरुण क्षेत्रपाल आपला रणगाडा घेऊन पुढे सरला. त्याच्या धडाडीला तोड नव्हती. त्याचे ज्ञान ताजे होते. वीस वर्षांचा हा भारतसुपुत्र मोठा जिद्दीचा आहे. त्याच्या अंगात विलक्षण धमक. त्याची मूर्ती आहे लहान. अजून तो भरायचा आहे. ओठावर मिशा फुटू पाहात आहेत पण त्याची उमेद मोठी आहे. त्याच्या अंगात रणमर्द पुरेपूर भिनला आहे.

पाहता पाहता त्याने शत्रूचा एक रणगाडा टिपला. त्याने विलक्षण उसळी मारली. त्याच्या रणगाड्याला गती आली. तो चेवला. शत्रूच्या लक्षात आले. शत्रूचे आणखी दोन रणगाडे त्याच्या अंगावर चालून येत आहेत. ते पुढे येण्यापूर्वीच अरुणने त्यांचा नाश केला आहे. पाहता पाहता तीन रणगाडे त्याने टिपले. चिनी बनावटीचे फुसके रणगाडे ! त्यांचा आवेश लटका. पण त्यांना भेटले खमंग भारतपुत्र. अरुणच्या रणगाड्याची तोफ नव्हतीच. ती होती मुलूखमैदान. तिला तोड नव्हती. ती गर्जू लागली. शत्रू हादरू लागला. हा रणशार्दूल रणगाडा त्याच्या डोळ्यांत खुपू लागला. शत्रूचा व्यूह ढासळू लागला.

शत्रू पुन्हा तुटून पडला आहे. मध्यभागी सापडला आहे अरुणचा रणगाडा. त्या पाकी गनर्सनी भयानक सातमजली हास्य केले असेल ! त्यांना वाटले आला आता हा तावडीत. दाखवू याला

हात. पाहू याची मिजास. बाकीच्या रणगाड्यांनीही कमाल चालविली आहे. सगळे पुढेच जात आहेत. शत्रूचे रणगाडे पेटू लागले आहेत. त्याचे मनोधैर्य ढासळू पाहात आहे. खऱ्या अर्थाने तुंबळ लढाई चालू झाली आहे.

चारी बाजूंनी अरुणचा रणगाडा वेढला गेला आहे. पण तो डगमगलेला नाही. उलट त्याला चढले स्फुरण. त्याला आला आहे जोर. शत्रूने केला कावा. हाणला गोळा अचूक. अरुणचा रणगाडा पेटला. कॅप्टन मलहोत्रांनी त्याला मागे फिरायला सांगितले आहे. पण तो तयार नाही. पेटता रणगाडा घेऊन त्याने अशी विलक्षण चाल केली आहे की शत्रू पाहातच राहिला आहे. पाहता पाहता त्याने एका रणगाड्याचा वेध घेतला. त्याला अग्नीची भीती नव्हती. भीती होती फक्त तीं आग दारूगोळ्यापर्यंत जाण्याची. पण तोपर्यंत तो लढणार आहे. सापडतील तितके रणगाडे फोडणार आहे.

अरुण जात होता पुढे पुढेच. पण वाटत आहे भीती कॅप्टन मलहोत्रांना. चारी बाजूंनीं त्यांचा रणगाडा पेटलेला आहे. मृत्यूचे पाश त्याच्या भोवती पडू लागले आहेत. रणगाड्याचा केव्हा स्फोट होईल याचा काही नेम नाही. वीस वर्षांचा पोरगा अग्नीच्या मुखात देण्याची त्यांची इच्छा नाही. ते विलक्षण काळजीत आहेत. अरुण परत फिरणार नाहीं याची त्यांना खात्री आहे. पण प्रयत्नांची पराकाष्ठा ते करणार आहेत. “ अरुण ” ते जवळ जवळ ओरडलेच “ मागं फीर, उडी मार. ”

“साहेब” अरुण उत्तरला. “ थोडं थांबा. यांचा पुरता समाचार घेतो एकदा. मग आलोच तुमच्याकडे. ”

त्याला बोलायलाही वेळ नाही. त्याच्या मुलूखमैदान तोफेचे सुरू झाले तांडव. तिने घेतला बळी एका रणगाड्याचा. त्याला

भान राहिले नाही. त्याला स्वतःचा विचारच उरलेला नाही. तो रणावेशाने भारून गेला आहे. कॅप्टन मलहोत्रा पुन्हा गरजले. पण आता त्याने उत्तरही दिले नाही. त्याने आणखी एका रण-गाड्याला यमसदनीं पाठविले! पेटलेला रणगाडा तांडवनृत्य करीत आहे. त्यात आहे रणझुंजार अरुण. सूर्यासारखा तेजस्वीं. त्याच्या पराक्रमाच्या दीप्तीने शत्रू दिपून गेला आहे. सराजचकच्या रणभूमीने हा जळजळता अंगार पाहिला आहे. हसत हसत मरणाला सामोरा जाणारा महान मृत्युंजय तिला पाहायला मिळत आहे.

"अरुण ऽ अरुण ऽ" कॅप्टन मलहोत्रा ओरडत आहेत तोच शत्रूच्या गोळीने अरुणचा वेध घेतला.

आता त्याचा ताबा सुटत आहे. रणगाडा वेडावाकडा होत दुसऱ्या रणगाड्यावर आपटत आहे. फुटत आहे. प्रचंड स्फोट होत आहे. त्यातील महापराक्रमी तेज संपत आहे!

अरुण क्षेत्रपाल ह्या नावाचे तेज आता पृथ्वीवर राहिले नाही. ते गेले. संपले. आपल्या कर्तव्याला तो विलक्षण रीतीने जागला. रणगाडा पेटल्यावर आपण राहणार नाही हे कळूनही अरुणने मृत्यूला मिठी मारली. त्यावर मात करून शत्रूला हात दाखविला. त्याला पाठ दाखवायची नव्हती.

त्याने एकट्याने सहा रणगाडे फोडले. बसंतार नदीच्या किनाऱ्यावर अशी लढाई कधी झाली नसेल. अरुणने नवीं क्षात्र-परंपरा इथे निर्माण केली. जवानांनीच काय पण शत्रूनेही त्याचे बलिदान पाहिले. त्याच्या बलिदानाने जवानांना नवे स्फुरण चढले. ते शत्रूवर तुटून पडले. कॅप्टन मलहोत्रांना फार वाईट वाटले. त्यांनी विलक्षण गतीने आपला रणगाडा पुढे काढला. आता त्यांना

कुणाची चिंता नव्हती. काळजी नव्हती. वीस वर्षांच्या पोराने नवा इतिहास निर्माण केला होता. तेही एका पाठोपाठ एकेक रणगाडा खलास करू लागले.

युद्धाचे चित्र बदलले. जवानांनी व रणगाड्यांनी शत्रूचे कंबरडे मोडले. अठ्ठेचाळीस चिनी रणगाडे बळी पडल्यावर शत्रू पळत सुटला. त्याचा धीर संपला. सराजचकरूपी ठाणे शत्रूने सोडले. बसंतार नदीच्या किनाऱ्यावर भारतीय तिरंगा लहरू लागला.

ज्याने तेथे अजोड पराक्रम केला तो अरुण मात्र तेथे ते दृश्य पाहण्यास नव्हता. त्याला ‘ महावीर चक्राचा ’ बहुमान मिळाला. महापराक्रम वयावर अवलंबून नाही. त्याचे वय लढण्याचे नव्हते. शिकण्याचे होते. पण त्याने दुसऱ्याला शिकविले.


त्याने शिकविला नवा क्षात्रधर्म. त्याने शिकविली मृत्युंजय वृत्ती. त्याने शिकविली अजोड कर्तव्यनिष्ठा. आपले नाव त्याने सार्थ केले. त्याच्या क्षेत्राचे पालन केले ! त्याला पाठ दाखवून तो पळाला नाही. त्याने पळविला शत्रू.

त्याच्या बलिदानाने सराजचक ही लढाई गाजली. रणगाड्यांची इतकी तुंबळ लढाई कधी झाली नसेल.

अरुण संपला नाही. कधी तो संपत नाही. तो पुन्हा क्षितिजावर येतो. अरुणचा हा पराक्रम पाहून कितीतरी नवे अरुण भारताच्या रणक्षितिजावर उगवतील ! तळपत राहतील ! झगमगत राहतील !

* * * *

# ६. लोंगेवालाची दफनभूमी



५ डिसेंबर १९७१ ची पहाट. राजस्थानची सरहद्द. लोंगेवाला भाग. सूर्याचा पहिला किरण तर राहोच. पण अजून तांबडं फुटायचं होतं त्या आधीच पाकिस्तानी हद्दीतून Tye ह्या दगाबाज चिनी रणगाड्यांचं पेव फुटू लागलं! त्या पाठोपाठ चिलखती गाड्या. आणि प्रचंड मनुष्यबळ. एक डिव्हिजन.

शत्रूनं कावा साधला. लोंगेवाला हा राजस्थानचा सीमाप्रदेश. तेथून शत्रूला राजस्थानात घुसायचं होतं. त्याची शेखमहंमदी खूण होती. जैसलमरे जोधपूर वगैरे भागावर हल्ला करायचा होता. शत्रूनं ज्या काही प्रचंड मोहिमा हाती घेतलेल्या होत्या त्यापैकी ही एक होती. शत्रूची जबरदस्त महत्त्वाकांक्षा त्यामागं लपलेली होती. १९६५ चा पराभवाचा कलंक त्याला पुसायचा होता. त्यावेळी जे जमलं नाही त्याचा वचपा होता काढायचा. जगानं त्यावेळी पाकी सैन्याची खरी किंमत ओळखली. आयूबची घोषणा हवेतच विरली होती. धोतर नेसणाऱ्या तीस भारतीय

जवानांना एक सैनिक जादा आहे असं तो बोलत असे ! धोतर नेसणाऱ्या भारताच्या झुंजार पंतप्रधानांनी--लालबहाद्दूर शास्त्रींनी —आयूबची जिरवली. एक भारतीय जवान काय करू शकतो हे जगाने तर ओळखलेच पण पाकी सेनान्यांनी जाणले. तो कलंक याह्याला पुसायचा होता. मागील युद्धात याह्या छांब आघाडीचा प्रमुख होता. त्याची पुरती पीछेहाट त्यावेळी झालेली होती. त्याचा वारस जनरल टिक्काखान यावेळी छांब भागात होता. त्यालाही रावळपिंडीपर्यंत पळत सुटावे लागले. राजस्थानच्या ह्या भागातून आक्रमण करण्याचा हाच हेतू होता.

मेजर कुलदीपसिंह चांदपुरी व लोंगेवाला ही दोन नावे या युद्धात विशेष गाजली. शत्रूच्या प्रचंड आक्रमणास पहिले तोंड मेजर चांदपुरींनी दिले. विश्वासाच्या, अभिमानाच्या जोरावर त्यांच्याजवळ एक डिव्हिजन सेनेला तोंड देण्याइतके जवान नव्हते, रणगाडे नव्हते, चिलखती दल नव्हते, दारूगोळा नव्हता. होती फक्त जिद्द. प्रचंड पौरुष. ध्येयवादी परंपरा.

मेजर कुलदीपसिंह चांदपुरींनी शत्रूची ताकद ओळखली. तातडीने कुठलीच मदत येण्यासारखी नव्हती. मेजरांनी आपल्या रणमर्द जवानांना आवाहन केले.

'भारतमातेचा जयजयकार' करीत भारतीय जवान शत्रूवर तुटून पडले. पराक्रमाची एक नवी विजयगाथा इथे निर्माण होऊ लागली. मेजर चांदपुरींचा तोफखाना असा काही विलक्षण गतीने गर्जू लागला की चिनी बनावटीचे Tye रणगाडे जागच्या जागी खलास होऊ लागले. चिलखती गाड्या पेटू लागल्या. आग ओकणाऱ्या शत्रूच्या मगरूर तोफा बंद पडू लागल्या. शत्रूच्या सैनिकांची पुढे येण्याची ताकदच होईना.

एका पाठोपाठ होऊ लागलेले कितीतरी हल्ले मेजर चांदपुरींच्या बहाद्दूर जवानांनी पाहता पाहता परतवून लावले. भारतीय जवानांचा इतका निकराचा हल्ला होईल अशी शत्रूची कल्पना नव्हती. पाकी सेनानींना गेली २५ वर्षे नेमकी हीच गोष्ट अजून कळली नाही. त्यांची कल्पना अशी आहे की अत्याधुनिक शस्त्रे व अस्त्रे असली की पुरे. मग चिनी व अमेरिकन अहीरावण–महीरावणांचे पाय धरून त्यांनी नव्या शस्त्रांची व अस्त्रांची भरती केली. त्या जोरावर त्यांना 'हिंदुस्थान' चिरडून टाकायचा होता. काश्मीर जिकायचा होता. याह्यासुरा ! महंमद बिन कासिमापासून हे कुणाला जमले नाही. तेराशे वर्षे झाली ! पंचवीस वर्षांत किती झेप घ्याल ! त्या भुट्टोलाही सांग समजावून हे !

मेजर कुलदीपसिंह चांदपुरींनी प्रयत्नांची शिकस्त केली. आक्रमण जबरदस्त होते. चार पाच तास त्यांनी निकराने तोंड दिले. तो शत्रूही चकित झाला. मूठभर भारतीय जवान विलक्षण गतीने पराक्रमाचा नवा आदर्श निर्माण करीत होते. तीरासारखे चमकत होते. त्यांनी पौरुषाची कमाल केली.

शत्रू जरा मागे हटला. त्याच्या आघाडीच्या काही तोफा बंद पडल्या, आता जरा मागे हटून तो हल्ले करू लागला. त्याच्याजवळ प्रचंड रणगाडा दल होते. त्याचा वापर आता मागे हटून त्याने कदाचित करण्याचा डाव केला असावा. हे नाटक मेजर चांदपुरींनी ओळखले.

जैसलमेरच्या विमान तळावर अखेर त्यांनी हवाई मदत मागितली. तेथील बहुतेक विमाने पाकी लष्करी केंद्रावर हल्ला करण्यास गेली होती. फक्त तीन वैमानिक तेथे हजर होते. त्यांची

'हंटर्स' विमाने तयार होती. मेजरांचा संदेश मिळताच स्क्वाड्रन लीडर दास, फ्लाईट लेफ्टनंट गोलाई व फ्ला. लेफ्ट. सुरेश लोंगेवालाकडे धावले. हंटर वैमानिक तयारच होते. हंटरची विनाशलीला आता शत्रूला कळायची होती. शत्रू मस्तीत होता.

मगरूर टी५९ रणगाड्यांच्या जोरावर शत्रू निवान्त होता. ते ४५ राक्षस आपले रक्षण करतील अशी त्याची कल्पना होती. हंटर विमाने घिरट्या घालू लागताच शत्रूचे धाबे दणाणले, हंटर विमानांनी एका पाठोपाठ रॉकेट्सचा असा काही तडाखेबंद मारा चालू केला की चिनी बनावटीचे रणगाडे ची ची करीत पेटू लागले. जळू लागले. "माओऽऽ! माओऽऽ" करीत ओरडू लागले ! आता त्यांची सुटका अशक्य होती, पाहता पाहता दहा-बारा रणगाड्यांची प्रेते वेडीवाकडी होऊन खाली पडली, शत्रूच्या विमानवेधी तोफा आग ओकू लागल्या, त्यांचे गनर्स एखादे विमान पाडण्याचा आटोकाट प्रयत्न करू लागले, पण त्यांच्या बापाचे बारसे जेवलेले भारतीय हंटर वैमानिक अशी काही विलक्षण कुशल हालचाली करीत होते की बिचाऱ्या शत्रूचा एकही गोळा नीट सुटेना! त्या विमानांची गती व झेप त्यांना कळेना. पाहता पाहता ती विमाने खाली येत. पुन्हा वर जात. एखादे गायब होई ! वास्तविक ते दारूगोळा भरून आणायला जाई ! पण शत्रूला हे गुपित कळले नाही. आलटून पालटून तिन्ही वैमानिकांनी अशी काही कमाल केली की पाकिस्तानच्या २७ व्या कॅव्हलरीचे निम्म्याच्या वर म्हणजे सुमारे २५ रणगाडे उद्ध्वस्त झाले. वरून विमाने व खालून मेजर चांदपुरींचा तोफखाना ! शत्रू बेजार झाला. त्याला पश्चात्ताप होऊ लागला. त्याच्या कितीतरी चिलखती गाड्या, जीप्स पेटलेल्या होत्या.

फ्ला. लेप्ट. सुरेश हल्ला करण्यासाठी इतक्या खाली आले की एका रणगाड्याने त्यांच्या विमानावर अचूक गोळा टाकला ! विमानाला प्रचंड गतीत धक्का बसला ! फ्ला. लेफ्ट. सुरेशांच्या डोळ्यांपुढे क्षणभर जबरदस्त अंधारी आली. विलक्षण आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी विमान सावरले. एकदम वर नेले. आगीचा लोळ उठला. त्यांच्या विमानाच्या शेपटीचा भाग तुटला ! आग थांबली. फ्ला. लेफ्ट. सुरेश त्या गोळा फेकलेल्या रणगाड्यावर नजर ठेवून होते. त्यांनी पाहता पाहता खाली झेप घेतली. तो रणगाडा तर अचूक उडविलाच पण अजून चार रणगाडे पेटवले ! शेपूट तुटलेले भारतीय विमान हल्ला करीत आहे हे पाहून शत्रू देखील स्तिमित झाला असेल. रॉकेट्स संपेपर्यन्त फ्ला. लेफ्ट. सुरेशनी त्या शेपूट तुटलेल्या विमानाने हल्ले केले व मग ते जैसलमेरला गेले ! त्यांनी एक नवाच विक्रम केला. भारतीय वैमानिक संकटांना तोंड देऊन त्यावर कशी मात करतात हे तर त्यांनी दाखवलेच पण त्या फुटक्या विमानाने हल्लेही करतात हे जगाला समजले.

आता स्क्वाड्रन लीडर दास व फ्ला. लेफ्ट. गोलाईनी पुन्हा निकराने हल्ले केले. शेवटचा रणगाडा नष्ट होईपर्यन्त ते हल्ले करीत राहिले. अखेर पाकिस्तानच्या २७ व्या कॅव्हेलरीचे सर्वच्या सर्व म्हणजे ४५ रणगाडे जळून मेले ! ची ची करीत पेटले. वायुदलाने अजरामर कामगिरी केली. हंटर वैमानिकांनी लोंगेवाला परिसर गाजविला. त्यानी ऐनवेळी जी कामगिरी केली ती मेजर चांदपुरी व त्यांचे पराक्रमी जवान कधी विसरणार नाहीत. पायदळाच्या संकटकाळी ह्या युद्धात हवाईदल सतत धावून आले. संकटातून त्याची मुक्ति केली. शत्रूला जबरदस्त पाणी पाजले. ह्या हंटरांचा नाश करण्यासाठी पाकी कमांडरने वारंवार पाकी हवाई-

दलाची मदत मागितली. पण हंटर विमाने हल्ला करीत आहेत हे ऐकून एकही पाकी वैमानिक तयार होईना ! शत्रूच्या पायदळाला हवाई साथ मिळाली नाही ! विचारे ! पायदळ ! पायावर बसणाऱ्या भारतीय जवानांच्या गोळ्या चुकवीत पळू लागले !

मेजर चांदपुरींनी लोंगेवालाच्या परिसरातील विविध ठाण्यांवर संपर्क साधून जवान बोलावले. अधिकारी गोळा केले. जवानांच्या तुकड्यांच्या तुकड्या येऊ लागल्या. भारतीय सेनेचा प्रचंड सागर दिसू लागला. जवान शत्रूवर तुटून पडले. आगीचा वर्षाव चालूच होता. आता रणगाड्यांची भीती नव्हती. त्यांचे मुडदे अजून जळत होते. शत्रूने निकराचा सामना करण्याचा प्रयत्न चालू केला. पण त्याला हार खावी लागली. पाकी सैनिकच काय पण अधिकारी पळू लागले. शत्रूच्या प्रेतांचा खच पडला. पाहावे तिकडे त्यांची प्रेतेच प्रेते !

आता मेजर चांदपुरींच्या जवानांनी शत्रूच्या हद्दीत त्यांचा पाठलाग चालू केला. शत्रूचे वीर सैनिक पिसाट पळत होते. त्यांना त्यांचे प्राण वाचवायचे होते. सगळी हत्यारे टाकून ते पळत होते. त्यांचे शूर अधिकारीही त्यांच्या पाठोपाठ पळत होते. याह्या-सुराच्या ह्या सेनेत पळण्याची शर्यतच लागली जणू !

शत्रूच्या प्रचंड आक्रमणाची सारी तयारी मेजर चांदपुरींच्या हाती लागली. भारी तोफा, मशीनगन्स, रॉकेट्स, रॉकेट लांचर्स, हातबॉम्ब, तोफगोळे, चिलखती गाड्या, सशस्त्र जीप्स वगैरे कितीतरी रणसाहित्य आपल्या ताब्यात आले. त्याची किंमत करता येणार नाही. पण शत्रूला त्याची फिकीर नव्हती. त्याच्या हातात कायमची झोळी होती. ती झोळी पसरून त्याला वारंवार साऱ्या जगात शस्त्रांची भीक मिळत होती.

मेजर कुलदीपसिंह चांदपुरींना त्यांच्या विलक्षण साहसाबाबत ‘ महावीर चक्र ’ मिळाले. प्रचंड आक्रमण त्यांनी केवळ काही तासांतच शूर वैमानिकांच्या व जवानांच्या सहकार्याने परतवून लावले. शत्रूला त्याच्याच हद्दीत आत पिटाळले. प्रचंड रणसाहित्य मिळविले.

मेजर चांदपुरींनी दाखवलेल्या अजोड आत्मविश्वासाचे हे फळ आहे. शत्रूसेनेचा महासागर पाहून ते पळत सुटले नाहीत. मूठभर जवानांच्या मदतीने त्यांनी शत्रूला प्रथम काही तास खेळवीत ठेवले. नंतर त्यांचा समूळ नाश केला.

मेजर चांदपुरीसारखे कर्तव्यदक्ष अधिकारी हे भारतीय सेनेचे महावीर तर आहेतच पण भूषणही आहेत.

त्यांनी लोंगेवालाची भूमी रणगाड्यांची दफनभूमी करून सोडली !

* * * *

# ७. असे जिंकले गंगासागर



लान्स नाईक अल्बर्ट इक्कांची कामगिरी कोण विसरेल ? त्यांनी केलेला भीमपराक्रम, त्यांची ती धडक, ते साहस, सारे वेगळेच आहे. त्यांनी दाखविलेले धैर्य केवळ असामान्य आहे. हा भारतीय सेनेतील तळपता हिरा होता हिरा. पौरुषाचा मेरूमणी. संकटावर मात करणारा नौजवान. त्याला नव्हती भीती. नव्हती क्षिती. माहीत होते एकच. शत्रूचा निःपात. निघाला होता तो पाणी पाजायला शत्रूला. पराक्रम पाहून त्याचा शत्रूही थरकला. तो घाबरला नाही काळाला. दिसत होता त्यांना मृत्यू समोर. पण डरला नाही. मागे सरला नाही.

लान्स नाईक इक्कांची कंपनी 'गंगासागर' च्या मोर्च्याकडे सरकत होती. तिचे नेतृत्व तेच करीत होते. वरिष्ठांनी त्यांच्यावर ही जबाबदारी टाकलेली होती. त्यांना कामगिरी हवीच होती. त्यांचे हात सळसळत होते. मुठी वळत होत्या. निरपराध बंगाली

लोकांची नाहक क्रूर हत्या करणाऱ्या निलाजऱ्या निमकहराम पाकी सैतानांचे कधी गळे दाबीन असे त्यांना झाले होते. त्यांनी केलेले पाशवी अत्याचार पाहून बंगालमधील दगडांनी अश्रू ढाळले असतील. त्या नराधमांनी काहीएक करण्याचे शिल्लक ठेवले नव्हते. बंगाली माती कितीतरी जिवांना पोटात घेऊन बसली होती. त्याच मातीला साक्ष ठेवून लान्स नाईक अल्बर्ट इक्कांना सैतानांना धडे शिकवायचे होते.

त्याच आगळ्या विचारात ते व त्यांचे जवान 'गंगासागर' कडे निघाले. जवानांना त्यांनी सगळ्या सूचना दिल्या होत्या. सैतानांना चाहूल लागली. त्यांनी आग पाखडायला आरंभ केला. चिनी तोफा आग ओकायला लागल्या. अमेरिकन मशीनगन्स श्रावणधार सोडू लागल्या. ला. ना. इक्कांची कंपनी सरपटत निघाली. सगळ्यात पुढे ते निघाले. समोर खंदक दिसत होता. त्यातच ती कर्दनकाळ मशीनगन होती. ती बंद पाडल्याशिवाय इलाज नव्हता. ती बंद पाडण्याचे त्यांनी ठरविले. त्यांनी वेग वाढविला. ते जवळ येऊ लागले तसे बंकरमधून एकजण खालून स्टेनगनचा मारा करू लागला. त्या काही गोळ्या त्यांच्या पायात घुसल्या. ते रक्तबंबाळ झाले. त्यांना रणमद चढला. ते बेभान झाले. मरणाची त्यांना खंत नव्हती. त्यांनी खंदकात उडी मारली. दोन सैतान त्या बंकरमध्ये होते. जो मशीनगन चालवीत होता त्याच्या पोटात प्रथम संगीन खुपसली. त्या पाठोपाठ दुसरा भोसकला. मशीनगनचा वर्षाव संपल्यामुळे त्यांची कंपनी आता उठून पळत येऊ लागली.

शत्रूची तयारी दणकट होती. एका पाठोपाठ खंदक खणलेले होते. ठाण्यापर्यंत शत्रूला लवकर पोहोचता येऊ नये याची खबर-

दारी शत्रूने व्यवस्थित घेतलेली होती. संरक्षणाच्या बाबतीत पाकी सेनानी जितकी काळजी घेत तितका लढा त्यांचे सैनिक देऊ शकत नसायचे. भारतीय जवानांना इतकी ' सुव्यवस्था ' कोठेच नव्हती. घोड्यावर बसून जाता जाता हुरडा खाणारी ही रणनवऱ्यांची जात. त्यांना काहीही लागत नाही. पराक्रम करा म्हणून सांगावे लागत नाही.

लान्स नाईक अल्बर्ट इक्कांची कंपनी एकेका खंदकातील गनिमांचा समाचार घेऊ लागली. रक्तबंबाळ झालेले ला. नाईक इक्का त्या तशा अवस्थेतही गनीम टिपू लागले होते. आणखी एका खंदकातून मशीनगनचा मारा सुरू झाला. सारे जवान पटापट खाली असलेल्या खंदकात लपले. त्यातील गनिमांचे मुडदे तेथेच पडले होते. त्यांच्याच उरावर जवान पडले. शत्रूने अनायसे सोय केली होती, त्याचा फायदा जवानांनाही मिळाला.

ला. नाईक इक्का मात्र सरपटत सरपटत व वाटेतील एखाद्या चुकार बंकरमधील गनीम टिपत त्या मशीनगनकडे निघाले. ते जिवाच्या करारावर निघाले होते. त्यांचे शरीर हालचाल करण्यास तयार नव्हते. त्यांना खरं म्हणजे विलक्षण थकवा आलेला होता. पण त्या नाशवंत शरीराकडे पाहाण्यास त्यांना वेळ अजीबात नव्हता. पाहता पाहता त्यांनी त्या मशीनगनवाल्या खंदकात काळझेप घेतली. त्याच क्षणी त्यांनी तो सैतान खलास केला. ती मगरूर मशीनगन अखेर बंद पडली.

कंपनीने लगेच जोर केला. उरलेले गनीम ती कापीत सुटली. भारतीय जवानांनी भारतमातेचा जयजयकार केला. ते गनिमावर तुटून पडले. ठाण्याच्या मागील बाजूला असलेले काही गनीम पळत सुटले. वास्तविक त्यांना हल्ला करता आला असता. पण पुढे

सरकणारे कर्दनकाळ भारतीय जवान पाहून त्यांच्या हातातील बंदुका गळून पडल्या ! ते पळत सुटले.

'गंगासागर' ठाणे काबीज झाले. शत्रू संपला होता. पण ठाण्यावर फडफडणारा तिरंगा झेंडा पाहण्यासाठी लान्स नाईक अल्बर्ट इक्कांचा प्राण घुटमळत होता. जवानांनी त्यांना ठाण्यासमोर आणून झोपविले. त्यांचे हाल जवानांना पाहावत नव्हते. डॉक्टरी इलाजांचा काही एक उपयोग होणार नव्हता. अगदी क्षीण आवाजात त्यांनी पाणी मागताच एका जवानाने आपल्या बाटलीतील पाणी त्यांना पाजले. चिंध्या झालेला हात त्यांनी कसातरी वर उचलला. ठाण्यावर झेंडा लावण्याची खूण केली.

एका जवानाला ते उमजले. त्याने पटकन त्या 'गंगासागर' ठाण्यावर फडफडणारा अशोकचक्रांकित ध्वज फडकवला. जवानांनी घोषणा दिल्या.

"भारत माताकी जय ऽ"

"इंदिरा गांधीकी जय ऽ"

लान्स नाईक अल्बर्ट इक्का धन्य झाले. त्यांनी एकवेळ त्या मानाने डुलणाऱ्या भारतमातेच्या निशाणाला पाहिले. तेथील माती कपाळाला लावली. एकवार गळ्यातील क्रूसकडे पाहिले. त्यांना डोळ्यासमोर रक्तबंबाळ झालेला येशू दिसत होता... खिळे मारलेला... मानवतेसाठी अश्रू ढाळणारा येशू दिसत होता... त्यांना खुणावीत होता. छातीला हात लावून त्यांनी एकवार वंदन करण्याचा प्रयत्न केला... पण तो पूर्ण झाला नाही.

लान्स नाईक अल्बर्ट इक्का गेले. ठाणे जिंकल्याच्या अपूर्व आनंदात त्यांनी मरणाला मिठी मारली. कर्तव्यपूर्तीचा आगळा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

त्यांच्या ह्या अजिक्य पराक्रमाबाबत त्यांना ' महावीर चक्र ' (मरणोत्तर) मिळाले. त्यांच्या पौरुषाचा जयजयकार झाला. ' गंगासागर ' त्यांच्या बलिदानाने पवित्र झाले.

देशाला याची जाणीव सतत राहील. देश त्यांचा ऋणी राहील.

* * * *

# ८. वाळवंटातील काळभैरव



सिंधचे उजाड वाळवंट. भारताच्या सीमेवर पाकी बंदोबस्त भरपूर आहे. सगळीकडे वाळूच वाळू. एकही रस्ता धड नाही. प्यायला पाणी नाही. नीट वाटा नाहीत. फक्त उंट जाऊ शकतात. चालत गेले तर भसाभस पाय आत रुततात. एकेक फूट पाय एकदम आत जातात. जीवघेणी तहान लागते. एखादी विहीर दिसली तर शत्रूने त्यात वीष तर टाकले नाही ना ही भीती ! आणि जवळचे पाणी प्यावे तर जीपस् कशा चालतील ?

वाळवंटात जीप्स ? त्या चालणार कशा ? जिथे माणसांना जाता येत नाही तिथे जीप्स कशा गेल्या ? सीमेवरील पाकी सैन्याला दिसल्या नाहीत का ? मुळीच नाही. पाकी ठाणी आहेत भारताकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यावर. भारताच्या झुंजार जवानांनी ह्या जीप्स आडमार्गाने आणल्या आहेत.

कोण आहेत हे जवान ? हो, तेही खरेच. तुम्हाला हे माहीत असायला हवं. ह्या १९७१ च्या युद्धाच्या वेळी हा प्रयोग प्रथमच

ह्या भागात केला जात आहे. हे जवान आहेत १० व्या 'पॅराशूट कमांडो' बटॅलियनचे रणझुंजार जवान. 'पॅराशूट कमांडो' जवान म्हणजे शंभर टक्के वेगळा जवान. जी कामे इतरांना जमणार नाहीत ती कामे हे चुटकीसरशी पार पाडतात. त्यांना काहीही अशक्यप्राय नाही. जेवढी काही वाहने युद्धात वापरतात ती त्यांना चालविता येतात. सर्व. शस्त्रांची माहिती त्यांना असतेच. वीस हजार फूट उंचीवरून विमानातून ते सहज उडी मारू शकतात. पाठीवर शंभर पौंडांचे वजन घेऊन हे बहाद्दर चाळीस चाळीस मैल पळत जातात. काय सांगताय काय ? ह्यांचे सारेच चमत्कारिक आहे. एवढेच नाही, लढताना त्यांना तहान नसते, झोप नसते आणि अर्थात भूकही नसते ! मृत्यू येईपर्यंत ते लढू शकतात. अजब आहे. त्यांना तसा सराव असतो. अखेर तीही माणसेच आहेत. पण जिद्दीची आहेत. ध्येयवादी आहेत. रणझुंजार प्रवृत्तीची आहेत. त्यांना भीती नाही. उन्ह नाही. तहान नाही. थंडी नाही. वारा नाही. शत्रूच्या समोरून न जाता ह्यांना शत्रूच्या पाठीमागे सोडले जाते. मुख्य म्हणजे रसद तोडण्याची किमया हे करतात. शक्यतो ह्यांना पॅराशूटमधून उतरवतात. शत्रूचे पूल तोडणे, रेल्वे उडविणे,दारूगोळ्यांची कोठारे नष्ट करणे ही ह्यांची कामे आहेत! आणि हे सारे शत्रूच्या मुलखात करावे लागते ! अरे बापरे ! पण हे कुणाला दिसले तर ? सापडले तर...? मृत्यूशिवाय दुसरा उपाय नाही. शत्रूच्या भूमीवर हे जेव्हा उतरतात तेव्हाच त्यांनी एका अर्थाने प्राण सोडलेला असतो ! म्हणूनच लेचेपेचे शेंदाड शिपाई ह्यासाठी उपयोगी पडत नाहीत. अतिशय धाडसी व रणझुंजार तरुणांची भरती ह्यासाठी केली जाते. ह्या भागात उतरलेली १० वी पॅराशूट कमांडो बटॅलियन अशाच रणमर्द जवानांची आहे.

पॅराशूटने न उतरता येथे हे जवान जीपने चालले होते. जीप्स जाऊ शकत नव्हत्या. पण भारताचे जवान संकटावर मात करणारे आहेत. त्यांनी ह्यावरही शक्कल काढली. पांघरायचे ब्लॅंकेट त्यांनी वाळूवर पसरायला आरंभ केला व हळूहळू जीप्स पुढे जाऊ लागल्या. शेकडो पौंड दारूगोळा घेऊन जीप्स शत्रूच्या हद्दीत घुसू लागल्या. त्यांना त्या भागातील ‘छाछरो’ व ‘थीरवाह’ ह्या चौक्या घ्यावयाच्या आहेत. शत्रूला न कळत !

ह्या १० व्या पॅराशूट कमांडो बटॅलियनचे प्रमुख आहेत लेफ्टनंट कर्नल सवाई भवानीसिंह. मेवाडचा हा वीर आहे जयपूर घराण्यातील. मेवाडच्या राजपूतांचे नाव काढल्याबरोबर ‘बादशाही’ फौजांची दयनीय अवस्था होत असे. राणा प्रताप, वीर दुर्गादास वगैरेंची नावे घेतली की मोगल चळाचळा कापत. मेवाड म्हटले की आठवतात हे महावीर. मेवाड म्हटले की आठवते पद्मिनी मेवाड म्हटले की आठवते पराक्रमांची मालिका. ह्या मेवाडी महावीरांनी जर मोगलांशी टक्कर दिली नसती तर इतिहास बदलला असता. अशा मेवाडचा पारंपरिक वारसा घेऊन लेफ्ट. कर्नल सवाई भवानीसिंह ‘बारमेर’ भागातून सिंधच्या वाळवंटात ‘उतरले’ आहेत. याह्याखानी बादशाही फौजांची आता कशी त्रेधा तिरपीट उडणार आहे !

लेफ्ट. कर्नल सवाई भवानीसिंहांनी व त्यांच्या ‘कमांडो’ जवानांनी प्रयत्नांची शिकस्त करून ‘छाछरो’ परिसरात पाऊल टाकले. शत्रू अजून निवांत होता. त्याला चाहूल लागली नव्हती. गेल्या १९६५ च्या युद्धात पंजाब व काश्मीरमध्ये पाकिस्तानने काही हवाई छत्रीधारी सैनिक उतरवले होते. पण आमच्या सुजाण नागरिकांनी व अजोड जवानांनी त्यातील एकही जिवंत ठेवला

नाही. काहीजण उसाच्या फडात लपले. तर काही जणांची बाजूनी ऊस पेटवून देऊन त्यांची वाट लावली. पण संपूर्ण ‘ बटॅलियन ’ पाकी हद्दीत घुसली होती तरी याह्याखानी राजवटीला जाग आलेली नव्हती ! वा ऽ रे यंत्रणा ऽ ! वा ऽ रे पहारा !

एकदम गजब उठला. आमच्या जवानांनी जीप्सचे ‘सायलेन्सर’ काढून टाकले ! त्यांच्या यंत्रांचा प्रचंड आवाज येऊ लागला ! रणगाड्यासारखा प्रचंड आवाज ! कमांडो जवानांनी त्या पाकी ठाण्यावर पिसाट गोळीबार चालू केला. पाकी ठाणी अक्षरशः हादरली ! वाळवंटात रणगाडे ! “ तोबा ऽ तोबा ऽ ! या अल्ला ! ये क्या गजब हुआ ऽ ” पाकी सैनिकांची बोबडी वळली !

कमांडो जवानांनी ठाण्यावर तुफानी हल्ला केला. पाहता पाहता पाकी सैनिकांची प्रेतेच प्रेते दिसू लागली. रणगाड्यांच्या भीतीने अर्धमेले झालेले पाकी शेंदाडशिपाई पटापटा मरू लागले. उरलेले पळत सुटले ! जिवाच्या धास्तीने. इतके पळत सुटले की आसपासच्या त्यांच्या साऱ्या ठाण्यांवर व चौक्यांवर घाबरगुंडी उडाली.

“ भागो ! भागो !”

“ सैतान टँक लेके आये है ”

“ भागो ऽ ! भा ऽ गो ऽ ”

“ सैतान आये ! टँक आये ”

“ जान बचाओ ! खुदाके लिये भागो ऽ ”

काय चालू आहे हेच कुणाला कळेना. हजारो पाकी सैनिक दारूगोळा, शस्त्र एवढेच नव्हे तर ठाणी व चौक्या सोडून बेफाट पळू लागले. एखादी शर्यत असावी तसे !

गनिमीकावा विलक्षण यशदायी झाला. लेफ्ट. कर्नल सवाई

भवानीसिंह व त्यांच्या कमांडो जवानांनी एकही जवान न गमविता अपेक्षित ठाणी घेतली ! डोळे दिपवून सोडणारी लूट सापडली. गझनीच्या महंमदाने कोणे एकेकाळी भोळ्याभाबड्या भारतीयांना लुटले असेल. एका पाठोपाठ प्रचंड लूट केली असेल. त्याचा वचपा आज शेकडो वर्षांनी होत होता. गझनीच्या महंमदाचे वारस आज जिवाच्या भीतीने ठाणीच्या ठाणी सोडून जात होते. याह्याखाना ! जरा उघड डोळे ! पाहा तुझे मेणाचे गोळे ! कुठं आहे तुझा देश व त्यांची निष्ठा ! जो सैनिक सर्वात पुढे पळाला त्याला दे 'परम-वीर' चक्र !

लेफ्ट. कर्नल सवाई भवानीसिंहांच्या राजपुती गनिमीकाव्याने याह्याखानी सेनेची वाताहत झाली. कोणा एका भल्या ऑपरेटरने 'गनीम' रणगाडादलासह सिंधमध्ये उतरल्याची निष्ठापूर्वक वातमी वरिष्ठांना दिली व तो पळत सुटला. काही वेळातच टेहेळे पाकी विमान आकाशात उंचावर जवानांनी हेरले !

कमांडो सैनिक काय करू शकतात हे त्यांनी शत्रूला दाखविले. आता विमान-हल्ला होणार हे जवानांनी हेरले. जीप्स पुढील ठाणे घेण्यासाठी निघाल्या होत्या. 'उमरकोट' चे ठाणे मोकळेच होते. 'विटावा' कडे झेप होती. काही क्षणातच जवानांनी जिप्स वाळूच्या ढिगाऱ्याखाली लपविल्या ! जवानांनी देखील वाळूचा आश्रय घेतला. अपेक्षेप्रमाणे सहा सेवरजेट्स बॉम्ब टाकण्यासाठी आली ! पण त्यांना वाळवंटात काहीच दिसेना ! जादू झाली होती ! आली तशी विमाने परत गेली ! शत्रूला काहीच कळले नाही.

'त्रिटावा' ठाण्याला एकदम कमांडो जवानांनी 'घेराओ' करून तुफानी हल्ला चढविला. बेसावध शत्रू लढू शकला नाही.

कापाकापी चालू असतानाच पळाला ! आसपासच्या ठाण्यावरून जाताना त्यांच्या बरोबर तेथील ‘ एकनिष्ठ ’ पाकी शिपाई पळत सुटले. त्याही भागातील ठाणी मोकळी पडली.

मात्र जवानांना आगेकूच फार सावधतेने करावी लागत होती. शत्रूने मुक्तहस्ताने सर्वत्र सुरुंग पेरलेले होते. त्यांची ‘ चाहूल ’ प्रथम सराईत जवान घेत होते. मग आगेकूच. शिवाय विमानें केव्हा येतील याचा काही नेम नव्हता.

‘ बिटावा ’ येथे कमांडो जवानांनी कहर केला ! लेफ्ट. कर्नल सवाई भवानीसिंहांनी नवे साहस केले. ‘ बिटावा ’ कडे येताना अगदी मध्यरात्री जीप्सचे दिवे लावून जीप्स निघाल्या ! शत्रूच्या मुलखात ‘ लाईट ’ लावून केलेला हा पहिलाच हल्ला असेल ! लेफ्ट. कर्नल सवाई भवानीसिंहांनी केवढा धोका पत्करला होता ! पण त्यांच्याजवळ होता जबरदस्त आत्मविश्वास. प्रचंड जिद्द व धडाडीचे कमांडो जवान. पाकी सैनिक बरोबर फसले ! त्यांना वाटले ज्याअर्थी दिवे लावून गाड्या येत आहेत त्याअर्थी त्या आपल्याच. शत्रू काही दिवे लावून येणार नाही ! केवढा विश्वास !! ठाण्यासभोवती गाड्या येताच जवानांनी भराभर हातबॉम्ब टाकले. मुड्यावर मुडदे पडताच पाकी पळाले ! ‘ बिटावा ’ हाती आले.

एका पाठोपाठ ठाणी घेत भारतीय कमांडो जवान निघाले होते. एक आठवडा झाला तरी पाकी सेनानींनी इकडे लक्ष दिले नाही. मात्र आपल्या जवानांचे यावेळी अतिशय हाल झाले. त्यांना झोप तर नव्हतीच. पण जेवणखाण व पाणीही चार दिवस मिळाले नाही ! लेफ्ट. कर्नल भवानीसिंह व त्यांच्या जवानांनी उपाशी पोटानी ही मोहीम फत्ते तर केलीच पण पाहता पाहता दीड हजार चौरस मैलाचा प्रदेश व्यापला ! जिंकला ! एकही जवान न गमाविता !

मात्र ड्रायव्हर जवानांचे हाल इतके झाले की जीप्स हाणून हाणून त्यांचे पाय भयंकर अवघडले. इतके की ते सरळ होईनात. त्यांनी कर्तव्याची पराकाष्ठा केली होती. त्यांना त्यापुढे कशाचीही किंमत नव्हती. दिलेली कामगिरी त्यांना पूर्ण करावयाची होती.

थोडी विश्रांती घेऊन कमांडो जवान पुन्हा नव्या मोहिमेला निघाले. पूंछ व छांबच्या भागात शत्रूने इतके विलक्षण लक्ष घातले होते की त्याला इतर पाहण्यास सुचलेच नाही ! छांबमध्ये तर त्याचे कंबरडेच मोडले. मगरुर टिक्काखान तोंड काळे करून तेथून निघून गेला. त्याला काश्मीर हवे होते, फुलाफळांनी मुसमुसलेले. वैराण सिंधची त्याला जरूर नव्हती. तेथे हिंदूंची संख्या वरीच. त्यामुळे सुधारणा अजीवात केलेल्या नव्हत्या ! म्हणून सिंधच्या आक्रमणाकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही. त्यांना मदत पाठविता आली नाही. हवाईदलाने व नाविकदलाने अशी काही बहार केली होती की शत्रूचे पेट्रोलचे साठेच्या साठे पेटवून टाकले होते. त्यामुळे त्यांच्या विमानांना देखील पेट्रोल कमी पडले !

‘ विटावो ’ च्या पुढे कमांडो जवान एकेक ठाणी जिंकत निघाले. ‘ इस्लामकोट ’ ला घनघोर लढाई करावी लागली. लेफ्ट. कर्नल भवानीसिंह शत्रू आग पाखडीत असतानाही सगळ्यात पुढे होते. भारतीय जवानांनी ठाणे घेतल्यावर पाकी पळपुटे बहाद्दर पळत सुटले.

‘ नवाकोट ’ ह्या ठिकाणीही शत्रूने जबरदस्त मारा केला. गोळ्यांचा वर्षाव केला. पण त्यालाही कमांडो जवानांनी खडे चारले ! त्या आगीला न भिता ते पुढेच जात राहिले. खंदक–खंदक उद्‌ध्वस्त करीत गेले. मोजता येणार नाही इतका शत्रू कापून काढला. त्याची फटफजिती झाली. ठाणे सोडून त्याला पळावे लागले.

अशी पळापळी सिंधमध्ये प्रत्येक ठिकाणी झाली असती. पण तेवढ्यात याह्याखानाने युद्धातून पाऊल काढून घेतल्यामुळे फिरते आक्रमण थांबले.

लेफ्ट. कर्नल सवाई भवानीसिंह व त्यांच्या कमांडो जवानांनी ह्या युद्धात आगळी कारवाई केली. अशी वहारीची लढाई अन्यत्र कुठे झाली नसेल. निसर्ग संपूर्णपणे विरुद्ध असताना त्यांनी शत्रूला बेजार केले. नवनव्या युक्त्या काढून त्याच्या डोळ्यांत धूळ फेकली. विलक्षण साहसे करून ठिकठिकाणाहून त्याला पळवून लावले.

लेफ्ट. कर्नल सवाई भवानीसिंहांनी आपल्या अद्‌भुत साहसा-बरोबर कुशळ नेतृत्व व पराकोटीच्या पराक्रमाची नवी गाथा निर्माण केली.

त्यांना 'महावीर' चक्राचा बहुमान मिळाला आहे. जयपूरच्या ह्या महावीराने खरोखरच युद्धात नवे विक्रम केले ! अपूर्व साहस दाखविले. कल्पनाही करता येणार नाही इतका याह्या-मुलूख जिंकून आणला !

मेवाडचा हा महावीर कोण विसरेल ? वाळवंटातील ह्या काळभैरवांना शत्रू तरी निश्चित विसरणार नाही ! ! त्यांनी पाकिस्तानचे 'बाकिस्तान' करून टाकले.

* * * *

# ९ चिनी राक्षसांना मूठमाती!



नरबहाद्दूर छेली...! तुझ्या नावातच बहाद्दूर हा शब्द आहे. पण तो तू खरोखरच सार्थ केलास. तू प्रत्यक्षात वीरबहाद्दूर ठरलास. तुझ्या पराक्रमाला सीमा नाही. तुझ्या धाडसाला तोड नाही. आपल्या अचाट पराक्रमाच्या जोरावर तू एक दिव्य केलंस. शत्रूला तू असा काही हिसका दाखविलास की शत्रू पळाला. तोऽबा ऽ तोऽबा करीत पळाला. तुझं नाव घेतलं की आठवतो तुझा भीम-पराक्रम.

छांब भाग. याह्यासुराने ह्या ठिकाणी जबरदस्त आक्रमण केले आहे. त्याला हवंय काश्मीर. भारताचं वैभव. भारताची शान. हिमालयाची आकाशाला लाजविणारी धवलतम शिखरं. गुलाबाच्या रंगीबेरंगी फुलांनी व लालचुटूक सफरचंदांनी मोहरलेली काश्मीरची खोरी. एवढ्याशा छांब भागात अदूरदर्शी याह्यासुराने प्रचंड चिलखती दल व सुमारे चाळीस हजार सेना ओतली एका रात्रीत.

त्यातील एकही सैनिक परत आला नाही तरी त्याला वाईट वाटणार नव्हतं. त्याला मुन्नावर तापी नदी ओलांडून छांब भागातून 'अखनूर' कडं जायचं होतं. अखनूर जिंकलं की काश्मीर गळ्यात पडलंच. ही होती याह्यामहंमदी. त्याने त्याचा खास सेनानी कुप्रसिद्ध टिक्काखान त्यासाठी छांब मोहिमेवर पाठविला होता. तीन डिसेंबरला रात्रीच टिक्काखानाने छांबमध्ये जबरदस्त आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या दुर्दैवाने लेफ्ट. जनरल सरताजसिंग तेथे ठाण मांडून बसले होते. त्यांचे शेकडो अधिकारी व हजारो वीर जवान सुसज्ज होते. एकही सैतान भारतीय हद्दीत न येऊ देण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी वाटेल ते मोल देण्याची तयारी होती.

तीन डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून छांब भागात निकराची लढाई चालू होती. त्या परिसरातील कितीतरी बाजूनी तो पुढे येऊ पाहत होता. विशेषतः मुन्नावर तापी नदीच्या पुलाच्या परिसरात त्याने प्रचंड शक्ती ओतली होती. ती नदी ओलांडण्याचे गनीम सारखा प्रयत्न करीत होता. वीर जवान त्याला सतत मागे ठेचत होते. रणगाड्यांना रणगाडे भिडत होते. तोफांना तोफा भेटत होत्या. पायदळाला संरक्षण देण्यासाठी आलेल्या विमानांनी शत्रूची चिलखती ताकद खलास करत आणलेली होती. कधी कोठे झाली नाही इतकी त्याची मनुष्यहानी झाली. तापी नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर गनिमांच्या प्रेतांचा खच पडला होता. घराघरातून हुसकून आणलेले व सक्तीने भरती केलेले शेंदाड शिपाई अनुभव नसल्यामुळे पटापटा मरत होते. पाकी सेनानींनी भारतीय जवानांकडून जबरदस्त चपराक खाल्ली तरी त्यांना फिकीर नव्हती. रोज नवी भरती त्या आघाडीवर होत होती. आगीच्या गोळ्याखेरीज

दुसरे तिसरे काहीच दिसत नव्हते. सगळीकडे आग ! तोफांचे कर्णकर्कश आवाज. रणगाड्यांची जीवघेणी घरघर. भारतीय विमानांचे पिसाट हल्ले. तापी नदीने कधी पाहिला नव्हता इतका मनुष्यसंहार चालू होता. याह्यासुरानेच जणू आपल्या सेनेची जाणूनबुजून कत्तल चालू केली होती. भारतीय जवान रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून बसले होते.

दहा डिसेंबरची रात्र. अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. दिवाळीच्या अंधारात झालेले दारूकाम जसे शोभून दिसते तसे तोफेचे गोळे अंधारातून चमकून जात होते. रक्तपिपासू पिसाटांची ही दिवाळीच होती. शत्रूला तापी नदीच्या पलीकडे ढकलून दिले आहे. तिच्या पूर्व किनाऱ्यावर एकही गनीम दिसत नव्हता. गनिमांच्या झालेल्या अपूर्व कत्तलीमुळे तापी नदी लाल बनली आहे.

अशा अंधारात एका मोर्च्यावर नाईक नरबहाद्दूर छेली जागता पहारा करीत आहे. त्याचे रॉकेट लाँचर तयारीत आहे. शत्रूचे ठाणे त्याला समोर दिसत आहे. तेथून एक इंचही शत्रू पुढे सरकू शकत नाही. त्याने प्रयत्न जर केलाच तर त्याची धडगत नाही. नाईक छेली त्याची वाटच पाहात आहे. तो मोकळ्या मैदानात घुसला आहे. शत्रूची त्याला भीती राहिलेली नाही. आता लपून हल्ला करण्याचे काही कारण नाही. शत्रूला चांगला हिसका दाखविलेला आहे. शत्रूच्या रणगाड्याची तो वाट पाहात आहे. एकही राक्षस जर पुढे येऊ लागला तर त्याला टिपायला तो तयार आहे.

चिनी बनावटीच्या Tye रणगाड्यांचे सर्वत्र मुडदे पडलेले आहेत. चिनी भरवशावर याह्याने या ठिकाणी आक्रमणाचे धाडस केले. Tye रणगाड्यांची मालिकाच्या मालिका येथे घरघरत आणल्या. पण त्यांची वासलात लागली.

आताही अंधारात रणगाड्यांचा संहारक नाईक छेली उभा आहे. अंधारात रॉकेट लाँचरचा नेम साधणे शत्रुला कधीच जमले नाही. त्याला जे जे जमले नाही, साधले नाही, ते ते शूर भारतीय जवानांनी सहज सुलभ करून दाखविले. तोफांच्या गोळ्यांच्या प्रकाशात तापी नदीच्या पुलाची किनार अधूनमधून चमकत आहे. वीज चमकल्यावर दिसते तशी.

पाकी सेनेची धाव पुन्हा त्या पुलाकडे आहे. त्या पुलावर येण्यासाठीच त्याची जीवघेणी गोळामारी चालू आहे. त्याची कल्पना अशी की त्या गोळ्यांना भिऊन भारतीय जवान मागे हटतील. परंतु त्या गोळ्यांची पर्वा मृत्युंजय भारत सुपुत्रांना नाही. त्या तशा आगीतही ते शत्रूला मागे रेटीत आहेत. त्यांची ४०,००० हजार फौज, तोफखान्याची एक ब्रिगेड व रणगाड्यांची रेजिमेंट घाईला आलेली आहे.

त्या अंधारातही नाईक नरबहाद्दूरला चाहूल लागली. सिंहाला शेळीची लागावी तशी. रणगाडा पुढे येऊ लागला होता. तोच त्याच्या तोफेचे गोळे नाईक नरबहाद्दूरच्या आसपास फुटू लागले. सगळीकडे धूरच धूर पसरला. गोळ्यांचा वेग वाढला. नाईक नरबहाद्दूर रॉकेट लाँचर सावरू लागला. त्याने नेम धरला. एकदम आग सुटली. तिने वेध घेतला त्या चिनी राक्षसाचा. अगदी अचूक. भात्यातून सुटलेला बाण जसा. पुलाच्या पलीकडे पुलावर येऊ पाहात असलेला चिनी राक्षस पेटला. जळू लागला. त्या प्रकाशात त्या राक्षसांची मालिका त्या नरशार्दूलाला दिसू लागली. त्याच्या जिभेला पाणी सुटले. शिकार भरपूर होती.

नाईक नरबहाद्दूरने रॉकेट लाँचर पुन्हा लावला. मांजराच्या गतीने दबत दबत पुढे येणारा दुसरा राक्षस त्याने टिपला. त्याला

काय माहीत की आपला बाप अंधारात आपल्यावर डोळे ठेवून आहे. अखेरचा आचका देऊन तो दुसरा राक्षस पेटला.

पुन्हा काही वेळ शत्रू दबला. शत्रुच्या तीक्ष्ण नजरेत तो रॉकेट लाँचर भरला. त्याचा तिसरा राक्षस छोटचा चढावाआड लपून अचूक तोफगोळे मारू लागला. पण नाईक नरबहाद्दूरला सहा रणगाडे दिसले होते. ते सगळे त्याला 'हवे' होते. तापी रणचंडिकेच्या भूमीवर त्यांची आहुती पडायला हवी होती.

नाईक नरबहाद्दूरला त्याच्या अधिकाऱ्यांनी आडोशाला लपण्यास सांगितले. तोफांचा पिसाट मारा त्याच्यावर चालू झाला होता. पण त्या रणबहाद्दूराने ते ऐकले नाही. त्याची लपण्याची इच्छा नव्हती. उघड उघड हल्ला करणारा तो नरवीर होता. मागेपुढे, आसपास चारी दिशांना आग उठत होती. रणज्वालांच्या तांडवनृत्यात तो घेरला गेला होता. त्याचा अधिकारी वारंवार त्याला बाजूला जाण्यास सांगत होता. पण त्याच्या डोळयांत त्या चार शिकारी अजून भरलेल्या होत्या. दोन झालेल्या होत्या.

रणबहाद्दूराने पुन्हा नेम लावला. एक राक्षस हालचाल करू लागला होता. एखादा फूट तो पुढे सरकला असेल नसेल तोच त्याचा वेध घेतला गेला. नाईक नरबहाद्दूराचे काम साधले होते. तिसरा राक्षस संपला. आता चौथा !

पण शत्रू जरा दबला. एका पाठोपाठ तीन आहुत्या पडल्या. त्यांना तो रॉकेट लाँचर नष्ट करता येईना. ते महावीरांचे काम आहे. त्यासाठी पांडुरंग साळुंखे हवाय ! गनिमाजवळ तो कसा असणार. खानसाहेबांचे ते काम नव्हे. औरंग्याच्या तंबूचे कळस कापणारे धनाजी–संताजी ज्या देशात जन्मले होते त्या देशाची ही परंपरा आहे. याह्याच्या देशाला कुठं होती परंपरा ! कुठं

होता इतिहास ? इंग्रजांच्या भेदनीतीच्या कटू फळाचा परिणाम म्हणजे त्याचा देश. त्याला परंपरा होती विश्वासघाताची, पापाची, सैतानांची. त्याचा इतिहास होता काळा.

रणबहाद्दूर आता चौथ्याची वाट पाहात आहे. त्या रणमर्दाला चढला आहे रणमद. त्या सर्वांचे बळी घेतल्याशिवाय रणचंडी शांत होणार नव्हती.

डोळे फाडफाडून तो अंधारातून पाहू लागला. त्याला शिकार हवीय. राक्षस पुलावर तर आला नाही ? क्षणभर त्याला वाटून गेले. मग तो स्वत:शीच हसला. आपण इथं असताना तो कसा येऊ शकेल ?

एकदम प्रचंड वादळ सुटले. सगळी धूळ उठली. तशा परिस्थितीतही त्याला राक्षसाची घरघर ऐकू येऊ लागली. त्याने अंधाराचा छेद घेतला. त्याच्या डोळ्यांत मांजर शिरले ! त्याला अंधारातून दिसू लागले. पुलावर राक्षस येऊ लागला होता. त्याने त्या वादळाचा फायदा घेतला,

"ये हिंमत" रणबहाद्दूर मनाशी पुटपुटला. त्याने रॉकेट लाँचर फिरविला. नेम सुटला. रॉकेटने राक्षसाच्या नरडीचा घोट घेतला. काम फत्ते झाले. आता पाचवा राक्षस. चौथ्या राक्षसाची पेटली चिता. त्या प्रकाशात त्याला उरलेले दोन राक्षस दिसले. त्याच्या पाठोपाठ ते होतेच.

नाईक नरबहाद्दूरने एक छद्मी हास्य केले. त्याचा आनंद गगनात मावेना. अंधळा मागतो एक डोळा पण देव देतो दोन ! त्याच हास्यानंदात त्याने रॉकेट सोडले. पांचवा मुडदा कोसळला. शत्रूच्या पाच राक्षसांनी जीव सोडला होता. बिचारे 'तापीवासी' झाले. त्यांचे मरण चीनमध्ये नव्हते ! इथे नेमले होते.

आता नरबहाद्दूर शेवटची शिकार शोधीत होता. पण तो पळून गेलेला त्याला दिसला नाही. पाचवा राक्षस खतम होताच त्या सहाव्या फुसक्या चिनी राक्षसाने उलटा पळ काढला होता. आपले भवितव्य त्याला कळून चुकले होते, त्याचा अधिकारी ‘ पुढे चल ’ असे सांगत असताना देखील त्याने आज्ञा मानली नाही. कारण उघड होते. त्यांचा बाप समोर उभा होता. तो एक इंचही पुढे सरकू देत नव्हता !

नाईक नरबहाद्दूराने आपल्या बहाद्दूरपणाने रणगाड्यांचे आक्रमण थोपविले ! शत्रूचा एकही रणगाडा पुढे येण्याचे धाडस आता करीना. पूल ओलांडण्याचे त्यांचे स्वप्न भारताच्या सुपुत्राने मुरगळून टाकले !


नाईक नरबहाद्दूराच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने धावत येऊन त्याची पाठ थोपटली ! आजची रात्र त्याने गाजविली होती. शत्रू थोपवूनच धरला नव्हे तर त्याला अक्षरशः पळवून लावले. शत्रूच्या ठाण्यावर सामसूम झाली

पहाटेच्या लालम्लाल धूसर प्रकाशात भारतीय जवानांनी काय पाहिले ? शत्रूच्या ठाण्यावर कोणीही नव्हते ! तापी नदीचा पश्चिम किनारा मोकळा होता. गनिमांची चाहूल नव्हती. फक्त पाच राक्षसांची प्रेते एकाकी पडली होती !

लान्स नाईक नरबहाद्दूर छेलीना त्याच्या भीमपराक्रमाबद्दल ‘ महावीर चक्र ’ मिळाले. त्या रात्रीचा तो खरोखरच महावीर होता. इतक्या प्रचंड तयारीनिशी आलेल्या गनिमाला साधे रॉकेट लाँचर किंवा त्याचा चालक नष्ट करता आला नाही !

चिनी राक्षसांना तापी नदीच्या पुलावर मूठमाती देणारा भारतबहाद्दूर जगभर गाजला. * * * *

# १० पळापळीची लढाई!




बांगलातील प्रमुख लष्करी केंद्रांपैकी एक जेस्सोर. येथे याह्याची फार मोठी छावणी होती. अघोर निकराचा प्रतिकार अपेक्षित होता. मुक्तिवाहिनीच्या सहकार्याने शत्रूच्या सर्व तयारीची इत्थंभूत माहिती, भारतीय सेनानींनी मिळविलेली होती. शिवाय खास 'वानरवाहिनी' ही होती. शिकवून तयार केलेल्या ह्या माकड-सेनेच्या माकडांनी शत्रूची गुप्त ठाणी अचूक हेरून काढली. विशेषत: दाट झाडीच्या भागातील ठाण्यांचा त्यांनी शोध लावला. ही माकडे शिकवलेली आहेत हे शत्रूला कधीच कळले नाही. ह्या माकडांच्या पाळतीवर मुक्तिवाहिनीचे खास स्वयंसेवक असत. ठाण्याच्या आसपास ही माकडे विशिष्ट आवाज काढत. तेथे ठाणे आहे हे समजताच भारतीय जवानांचे कार्य सोयीस्कर तऱ्हेने पार पडत आले.

जेस्सोरच्या परिसरात शत्रूने इतके प्रचंड रणसाहित्य गोळा

केलेले होते की आसपासचे नागरिक भयभीत होऊन मागे हटले होते. उरलेले पाकी सैन्यानी हाकलून लावले होते. ठिकठिकाणी पद्धतशीर खंदक बांधून तयार होते.

मेजर जनरल दलबीरसिंह यांच्या नेतृत्वाखाली जेस्सोर परिसरातून भारतीय जवान आत घुसत होते. मे. ज. दलबीरसिंहांनी सर्व ब्रिगेड्सची योजना अशी काही केली होती की पाकी रणयंत्रणा कोलमडून पडावी. त्यांची संरक्षणफळी फुटावी. सैन्य सैरावैरा पळत सुटावे.

जेस्सोर भागातील एका ब्रिगेडीचे नेतृत्व ब्रिगेडियर जोगेंद्रसिंह गाराया करीत होते. आपल्या अधिकाऱ्यांना सर्व सूचना त्यांनी केलेल्या होत्या. अधिकारी व जवान अशी काही धम्माल उठवून देणार होते की याह्यासुराच्या सेनेची वाताहत व्हावी.

सर्व तऱ्हांनी जेस्सोर परिसरात भारतीय सेना घुसल्या. त्यात ब्रिगेडियर जोगेंद्रसिंहांची ब्रिगेड पहिली होती. सुरुवातीला शत्रूने कडवा प्रतिकार करण्यास आरंभ केला. त्याच्या तोफा व मशिनगन्स आगीचा वणवा ओकू लागल्या. प्रचंड भारतीय सेना पाहून पाकी सैनिक आपले भवितव्य कळून चुकले होते. परंतु माघार घेताना एकदम घ्यायची नाही असे त्यांनी ठरविले असावे! खंदकाखंदकातून त्यांनी प्रखर हल्ले चालू केले. आगीचा धोका लक्षात न घेता ब्रि. गारायांचे जवान शत्रूवर तुटून पडले. त्यांनी अशी काही सैन्यरचना केली होती की बांगलाच्या लढाईतील ते एक वैशिष्टच मानावे लागेल.

पाकी सैनिक वारंवार चिडून पिसाट हल्ले करीत, परंतु त्यांचे सर्व हल्ले परतवून लावण्यात आले. एवढेच नव्हे तर शत्रूची संरक्षण फळी तोडण्याचा प्रयत्न सुरू झाला. जवान प्रयत्न

BVBK-0400798